13 September 2026 page 01_Layout 1 12-09-2026 09:32 PM Page 1

RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
अॅड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. १३ सप्टेंबर २०२६**



१९२९- नांदगाव येथे श्री. सोमवंशी मेळाव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
१९३९- कोल्हापूर संस्थान दलित प्रजा परिषदेत डॉ बाबासाहेबांचे अध्यक्षीय भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार , १३ सप्टेंबर २०२६ | वर्ष : ६ | अंक : २५३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 13 September 2026 | Year : 6 | Issue : 253 | Daily | Rate: Rs. 5/-

# मराठा आरक्षणासाठी 'चलो मुंबई'

## मनोज जरांगे यांची १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाची घोषणा!





**अंतरवाली सराटीः** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या १४ दिवसांपासून सुरू असलेल्या बेमुदत उपोषणावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. या पार्श्वभूमीवर आज, १२ सप्टेंबर रोजी दुपारी समर्थकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करत मुंबईत धडक देण्याची अधिकृत घोषणा केली आहे. बैठकीत उपस्थितांना संबोधित करताना जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. "नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही," असा इशारा देत त्यांनी स्पष्ट केले की आता आंदोलकांची पावले मुंबईच्या दिशेने पडतील. सरकारकडून ठोस पावले उचलली जात नसल्याने अखेर मुंबई गाठण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, असे त्यांनी नमूद केले.

मनोज जरांगे यांनी यापूर्वीच १२ तारखेनंतर मुंबईला जाण्याचा इशारा दिला होता. आजच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सगेसोयरे अध्यादेशाची अमलबजावणी आणि मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्या पूर्णपणे मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नाही, या भूमिकेवर जरांगे पाटील ठाम आहेत.

जालना येथील अंतरवली सराटीतून सुरू होणारा हा मोर्चा पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर (पुणे) आणि खोपोली येथे चार मुक्काम करत पाचव्या दिवशी मुंबईच्या आझाद मैदानात शांततापूर्ण मार्गाने धडकणार आहे. अंतरवली सराटीतून सुरू होणारा हा मोर्चा अत्यंत शांततापूर्ण मार्गाने मुंबईच्या दिशेने पुढे सरकेल. चार ठिकाणी मुक्काम करत पाचव्या दिवशी हा मोर्चा मुंबईत दाखल होईल.

"लताताई (उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी) आणि अमृताताई (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी) यांच्या घरी जाऊन महिलांनी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करावा", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. "आम्ही जात आहोत मुंबईतील आझाद मैदानावर आणि आमची माय-माऊली, लाडक्या बहिणी जातील अमृता फडणवीस, लता शिंदे यांच्या घरी. तेथे जाऊन मराठा महिलांनी लताताई आणि अमृताताईंना हळद-कुंकू देऊन आरक्षण मागावं. महिलांनी लता शिंदे यांच्या घरी आणि अमृता फडणवीस यांच्या घरी जाऊन हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करा. मात्र, कोणत्या हळदी-कुंकवाचा? तर मराठा आरक्षणाच्या हळदी-कुंकवाचा. तेथे हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करत असताना सर्व महिलांनी लता शिंदे आणि अमृता फडणवीस यांना सांगायचं की तेवढं आम्हाला मराठा आरक्षण द्यायला सांगा", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे.

मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस प्रशासनाला स्पष्टपणे सांगतो की, रस्त्यात कुठेही बॅरिकेड् लावू नका. जर तुम्ही शांततेत जाणाऱ्या मराठ्यांना अडवले, तर तुम्हाला महाराष्ट्र मुद्दाम अस्थिर करायचा आहे, असा त्याचा अर्थ निघेल.

डोक्याने आणि संयमाने हे आंदोलन आपल्याला जिंकायचे आहे. पोलिसांनी अडवले तर कुठलाही वाद किंवा गोंधळ घालायचा नाही; शांततेने वाहने बंद करायची आणि रस्त्यावरच बिनधास्त झोपून राहायचे, असे आवाहन जरांगे यांनी केले.

ज्या मार्गाने आमची रॅली जाणार आहे, त्या मार्गावरील गावांनी कुटुंबकबिल्यासह रस्त्यावर येऊन लेकरांना पाठबळ द्यावे. ज्यांच्याकडे वाहने आहेत त्यांनी मुंबईच्या वेशीपर्यंत वाट लावायला सोबत यावे. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही शासकीय स्तरावर सुरू असलेल्या भूमिकेवर ताशेरे ओढताना जरांगे म्हणाले, हैदराबाद गॅझेटिअरचा जीआर शासनानेच काढला आणि आता सरकारी शिबिरांमधील अधिकारी म्हणतात की शपथपत्रावर प्रमाणपत्र देणार नाही. ही शिबिरे प्रमाणपत्रे देण्यासाठी नव्हे तर ती रद्द करण्यासाठी काढली आहेत का? न्यायदेवता गरीबांच्या पाठीशी ठाम उभी राहील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

# ब्रिक्स परिषदेने दिल्ली जाहीरनामा स्वीकारला



**नवी दिल्ली :** भारतात पार पडलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सर्वसंमतीने 'नवी दिल्ली जाहीरनामा' स्वीकारण्यात आला. यामध्ये 'ग्लोबल साउथ'मधील देशांमधील परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला असून, आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये विकसनशील देशांचा आवाज वाढवण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच जागतिक पातळीवर वाढणारा एकतर्फी दबाव, बेकायदेशीर आर्थिक निर्बंधांना स्पष्ट विरोध दर्शवत ब्रिक्स देशांनी अधिक प्रातिनिधिक, लोकशाही आणि बहुध्रुवीय जागतिक रचनेचा जोरदार पुरस्कार केला आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर आधारित आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे आवाहन करतानाच आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांना जागतिक मंचांवर अधिक प्रतिनिधित्व मिळायला हवे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत व्यापक सुधारणा करण्याची गरज या जाहीरनाम्यात व्यक्त करण्यात आली. सुरक्षा परिषदेसह संयुक्त राष्ट्रांच्या सर्व स्तरांवर भारताला आणि ब्राझीलला अधिक मोठी भूमिका मिळण्यासाठी रशिया आणि चीनने दिलेल्या पाठिंब्याचे या परिषदेत स्वागत करण्यात आले. याशिवाय, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), जागतिक बँक आणि इतर ब्रेटन वू संस्थांमध्ये विकसनशील देशांना मतदानाचे अधिकार आणि नेतृत्वातील सहभाग वाढवण्याची मागणी करण्यात आली.

काही देशांकडून लादल्या जाणाऱ्या एकतर्फी आर्थिक आणि दुय्यम निर्बंधांवर जाहीरनाम्यात थेट ताशेरे ओढण्यात आले. असे निर्बंध आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार बेकायदेशीर असून त्यामुळे गरीब व विकसनशील देशांचा विकास, अन्नसुरक्षा, आरोग्य व्यवस्था आणि मानवी हक्कांवर विपरीत परिणाम होतो, असे रोखठोक मत व्यक्त करण्यात आले. तसेच एकतर्फी आयात शुल्क (टॅरिफ) आणि बिगर-जकात अडथळ्यांमुळे जागतिक व्यापार आणि पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.

जागतिक स्तरावरील विविध संघर्षांवर लष्करी कारवाईऐवजी संवाद, प्रतिबंधात्मक मुत्सद्देगिरी आणि मध्यस्थीचा मार्ग अवलंबण्याची गरज ब्रिक्सने अधोरेखित केली.

गाझाच्या बाबतीत तत्काळ आणि कायमस्वरूपी शस्त्रसंधी, विनाअडथळा मानवतावादी मदत आणि पॅलेस्टिनी नागरिकांचे सक्तीचे विस्थापन रोखण्याची मागणी करण्यात आली. १९६७ च्या सीमेवर आधारित, पूर्व जेरुसलेम ही राजधानी असलेल्या द्वि-राष्ट्र सिद्धांताला पाठिंबा देत पॅलेस्टाइनला संयुक्त राष्ट्रांचे पूर्ण सदस्यत्व देण्याचे समर्थन करण्यात आले.

# जेसीबीच्या निष्काळजीपणाने वीजवाहिनी तुटली; सहा तासांपासून अंधार



**नागपूर :** प्रभाग क्रमांक २ मधील सहयोगनगर, नारी रिंग रोड परिसरात महानगरपालिकेच्या निष्काळजी कारभाराचा फटका नागरिकांना बसला. भारत गॅस गोडाऊनजवळ गटाराची मोठी पाइपलाइन टाकण्यासाठी जेसीबीने खोदकाम करताना भूमिगत एमएसईबीची वीजवाहिनी तोडली. परिणामी सकाळी ११.३० वाजल्यापासून संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा ठप्प असून सहा तास उलटूनही नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे.

भूमिगत वीजवाहिनी असल्याची माहिती न घेता जेसीबीने खोदकाम करण्याची घाई का करण्यात आली, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. वीजपुरवठा बंद झाल्यानंतर दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्याप काम पूर्ण झालेले नाही.

विशेष म्हणजे प्रभागातील नगरसेवकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांचा संताप आणखी वाढला आहे. नागरिकांच्या प्रश्नांवर घटनास्थळीही न पोहोचणारे लोकप्रतिनिधी नेमके कोणाच्या कामाचे? असा सवाल संतप्त नागरिकांनी केला असून, वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

# कृषी विभागाचा आकृतीबंध अखेर रद्द

**मुंबई :** तब्बल १७ वर्षानंतर तयार करण्यात आलेला कृषी विभागाचा आकृतीबंध अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या प्रखर विरोधानंतर रद्द करण्यात आला. पुढील मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने मंजूर झालेला आकृतीबंध अधिकृतपणे रद्द करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मंजूर झालेला आकृतीबंध तांत्रिक प्रवर्गावर अन्याय करणारा, शेतीच्या बांधावरील मनुष्यबळ कमी करून आस्थापना शाखेला बळ देणारा, आस्थापना शाखेला अतिरिक्त मनुष्यबळ पुरवणारा असल्याचा आरोप करून महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने आकृतीबंधाला कडाडून विरोध केला होता.



आकृतीबंधाच्या विरोधात पुण्यात धरणे आंदोलन, उपोषण उपोषण सुरू होते. मागील मंगळवारी मंत्रालयात आकृतीबंध संबंधित सर्व कर्मचारी संघटनांची बैठक घेण्यात आली. पण कर्मचाऱ्यांच्या बैठकीत मागण्यांवर एकमत होऊ शकले नाही, तसेच कर्मचाऱ्यांच्या मागण्यांमध्ये एक वाक्यता नसल्यामुळे आणि मागण्या एकमेकांच्या विरोधात गेल्यामुळे बैठक निष्फळ ठरली होती. त्यामुळे प्रस्तावित आकृतीबंध रद्द करण्यात यावा. अतांत्रिक आकृतीबंध तयार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि आकृतीबंध नव्याने तयार करण्यासाठी सर्वसमावेशक समिती निर्माण करण्यात यावी, अशी मागणी महासंघाने केले होती.

या सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर महासंघाच्या मागणीचा विचार करून कृषिमंत्र्यांनी आकृतीबंध रद्द केल्याची घोषणा केली आहे. मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने आकृतीबंध अधिकृतपणे रद्द केला जाईल, असेही भरणे यांनी म्हटले आहे. आकृतीबंध रद्द केल्याच्या घोषणामुळे महिन्याभरापासून आकृतीबंधावरून सुरू असलेले आरोप प्रत्यारोप शांत झाले आहेत.

# मंत्रालयाला ज्योतिष केंद्र बनवू नका; 'कालायन'चा निर्णय रद्द करा

## अंनिसचा सरकारला सवाल; विज्ञानाच्या नावाखाली ज्योतिषाला शासकीय प्रतिष्ठा का?

**मुंबई :** महाराष्ट्राच्या प्रशासनाचे सर्वोच्च केंद्र असलेल्या मंत्रालयात आता ज्योतिषाला शासकीय प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न सुरू आहे का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने उपस्थित केला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने ४ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार मंत्रालय परिसर आणि महाराष्ट्र विधानभवन येथे प्रत्येकी एक 'कालायन' उपकरण बसविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, त्यासाठी १० लाख ९७ हजार ४०० रुपयांचा सार्वजनिक निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निर्णय तातडीने रद्द करावा, अशी मागणी अंनिसने केली आहे.

या मागणीसाठी डॉ. हमीद दाभोलकर, राहुल थोरात, प्रवीण देशमुख, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे आणि श्रीपाल ललवाणी यांनी भूमिका मांडली आहे. भारतीय ज्ञानाच्या नावाखाली खगोलशास्त्र आणि ज्योतिष यांची सरमिसळ करून वैज्ञानिक दृष्टिकोनाबाबतच संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

'कालायन' हे केवळ वेळ दाखविणारे घड्याळ नसून त्यामध्ये राशी, नक्षत्रे, पंचांग आदींची प्रमाण वेळेशी सांगड घालण्यात आली आहे. ग्रहांची स्थिती, गती, सूर्योदय-सूर्यास्त यांची अचूक गणना करणे हा खगोलशास्त्राचा विषय आहे. मात्र ग्रह-नक्षत्रांच्या स्थितीवरून व्यक्तीचे भविष्य, भाग्य, व्यक्तिमत्त्व किंवा जीवनातील घटना सांगता येतात, हा ज्योतिषाचा दावा वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही. त्यामुळे खगोलशास्त्रीय माहिती आणि ज्योतिषीय विश्वास एकाच विज्ञानाधारित चौकटीत मांडणे हे जनतेची दिशाभूल करणारे असल्याचे अंनिसने म्हटले आहे.

मंत्रालय हे धोरणनिर्मिती आणि लोकसेवेचे केंद्र आहे; ते ज्योतिष मार्गदर्शन केंद्र बनता कामा नये. विधानभवन हे लोकशाहीचे सर्वोच्च संस्थात्मक व्यासपीठ आहे. अशा ठिकाणी ज्योतिषाशी संबंधित




उपकरणाला शासनमान्यता देणे म्हणजे अप्रत्यक्षपणे ज्योतिषीय विचारांना अधिकृत प्रतिष्ठा देणे होय, असा घणाघाती आरोप समितीने केला आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ५१(अ)(ह) नुसार वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती विकसित करणे हे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे शासनानेच वैज्ञानिक दृष्टिकोनाला बळ देण्याऐवजी विज्ञान आणि ज्योतिष यांची सरमिसळ करणाऱ्या उपक्रमाला सार्वजनिक निधीतून प्रोत्साहन देणे हा गंभीर विरोधाभास असल्याचे अंनिसने नमूद केले.

अंनिसचा भारतीय संस्कृती, पंचांग, पारंपरिक कालगणना किंवा प्राचीन भारतीय खगोलशास्त्राच्या योगदानाच्या अभ्यासाला विरोध नाही. मात्र खगोलशास्त्र आणि ज्योतिष यांच्यातील सीमारेषा पुसण्यास विरोध आहे, असे समितीने स्पष्ट केले आहे.

या निर्णयातील खासगी संस्थेच्या भूमिकेवरही अंनिसने प्रश्न उपस्थित केला आहे. शासन निर्णयात एका खासगी संस्थेने Expression of Interest (EoI) दिल्याचे आणि असे उपकरण बनविणारी ती एकमेव संस्था असल्याचे नमूद आहे. त्यामुळे सार्वजनिक निधी खर्च करण्यापूर्वी या उपकरणाची वैज्ञानिक उपयुक्तता, शैक्षणिक मूल्य आणि शासनाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाशी असलेली सुसंगती यांचे स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षण झाले आहे का, असा सवाल करण्यात आला आहे. महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारात देशाला दिशा दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रालयातच विज्ञानाच्या नावाखाली ज्योतिषाला प्रतिष्ठा मिळणे हा केवळ आर्थिक खर्चाचा नव्हे, तर वैज्ञानिक दृष्टिकोनाशी संबंधित गंभीर प्रश्न आहे, असे मधुकर गायकवाड, मुक्ता दाभोलकर, विनोद वायंगणकर, प्रकाश घादने, सम्राट हटकर आणि नीता सामंत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### अंनिसच्या प्रमुख मागण्या

१. 'कालायन' उपकरणांसाठी ४ सप्टेंबर २०२६ची प्रशासकीय मान्यता तातडीने रद्द करावी.
२. सार्वजनिक निधीतून खर्च करण्यापूर्वी उपकरणाचे स्वतंत्र वैज्ञानिक व तज्ज्ञ परीक्षण करावे.
३. विज्ञानाच्या नावाखाली ज्योतिषीय दाव्यांना शासकीय कार्यालयांत अधिकृत प्रतिष्ठा देऊ नये.









13 September 2026 page 02_Layout 1 12-09-2026 06:09 PM Page 1



“ मनाची शांती आणि छोटासा बदल यशाचा पाया ठरतो... ”

# बुद्धापासून न्या. बेला त्रिवेदींपर्यंत
## बहुमतापेक्षा विवेक श्रेष्ठ

अल्पमत म्हणजे पराभव नव्हे; कधी कधी तो संविधानाच्या विवेकाचा आवाज असतो!” 1 ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा अत्यंत महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न होता. बहुमताने 6:1 असा निर्णय देत अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण घटनात्मकदृष्ट्या अनुमत असल्याचे ठरविले आणि सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या ई. व्ही. चिनैया विरुद्ध आंध्र प्रदेश या निर्णयातील उपवर्गीकरण करता येणार नाही ही भूमिका बाजूला ठेवली.

मात्र एकट्या न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांनी ठाम असहमतीचा निर्णय दिला. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करता येणार नाही आणि क्रिमिलेयर लागू करता येणार नाही असे ठाम मत त्यांनी मांडले. त्यांचा हा निर्णय केवळ “अल्पमताचा निर्णय” म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. तो संविधानाचे कलम 341, राष्ट्रपतींची अनुसूचित जातींची यादी, संसदेला असलेला घटनात्मक अधिकार आणि राज्यांच्या विधायी अधिकाराच्या मर्यादा यांचा सखोल विचार करणारा निर्णय आहे.न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी आपल्या निर्णयाच्या प्रारंभीच एक अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. घटनात्मक प्रश्नांवर मोठ्या घटनापीठांमध्ये एकमत आणि सहमती ही कायद्यात निश्चितता आणि स्थैर्यासाठी महत्त्वाची असली, तरी योग्य कारणांवर आधारित असहमती (dissent) हीदेखील लोकशाही न्यायव्यवस्थेच्या प्रभावी कार्यासाठी तितकीच महत्त्वाची आहे. भविष्यातील कायद्याच्या विकासाची क्षमता अनेकदा अशा असहमतीत दडलेली असते. ही भूमिका स्वतःमध्येच अल्पमताच्या महत्त्वाचे घटनात्मक समर्थन आहे.

**अल्पमत म्हणजे :-** बहुमतासमोर स्वतंत्र विवेकाने उभे राहण्याचे धैर्य, प्रचलित विचारांची घटनात्मक चिकित्सा, आणि भविष्यातील न्यायशास्त्रासाठी पर्यायी मार्ग.



**बेला त्रिवेदींचा मूलभूत घटनात्मक प्रश्न :-** न्यायमूर्ती त्रिवेदी यांच्या मते, संविधानाच्या कलम 341 अंतर्गत राष्ट्रपतींच्या अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या अनुसूचित जाती या घटनात्मकदृष्ट्या एक वर्ग आहेत. त्यांनी असा निष्कर्ष काढला की राज्यांना त्या जातींचे अंतर्गत विभाजन किंवा उपवर्गीकरण करून आरक्षणाचे स्वतंत्र वाटप करण्याचा विधायी अधिकार नाही. त्यांच्या दृष्टिकोनाचा गाभा असा होता की, राज्याने दुर्बल घटकांना अधिक लाभ देण्याच्या उद्देशानेही कलम 341 अंतर्गत राष्ट्रपतींनी निश्चित केलेल्या यादीत अप्रत्यक्ष हस्तक्षेप करू नये. म्हणून हा केवळ आरक्षणाच्या धोरणाचा प्रश्न नाही. संविधानाने कोणत्या संस्थेला कोणता अधिकार दिला आहे आणि त्या अधिकाराच्या सीमा कोणत्या आहेत, हा मूलभूत घटनात्मक प्रश्न आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटनात्मक विचार :-** न्यायमूर्ती त्रिवेदी यांनी संविधान सभेतील 17 सप्टेंबर 1949 च्या चर्चेचा संदर्भ घेतला. कलम 341 च्या निर्मितीच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते की राष्ट्रपतींच्या अधिसूचनेनंतर अनुसूचित जातींच्या यादीत बदल करायचा असेल तर तो संसदेकडून केलेल्या कायद्याद्वारेच केला जाऊ शकतो. याच घटनात्मक रचनेचा आधार घेत न्यायमूर्ती त्रिवेदी यांनी राज्याला अनुसूचित जातींच्या घटनात्मक यादीचे अंतर्गत विभाजन करण्याचा अधिकार नसल्याचे प्रतिपादन केले. म्हणजेच मूलभूत प्रश्न असा - “सामाजिक न्यायाच्या नावाखाली संविधानाने आखून दिलेल्या अधिकारांच्या सीमाही ओलांडता येतील का?”

न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांचे उत्तर होते - ‘नाही.’ लोकशाहीत बहुमत आवश्यक आहे. परंतु बहुमत म्हणजेच अंतिम सत्य, असे समीकरण इतिहासाने कधीही सिद्ध केलेले नाही. बहुमताचा निर्णय कायदा निश्चित करू शकतो; परंतु त्या निर्णयाची न्याय, तर्क आणि संविधानाच्या कसोटीवर चिकित्सा करणे आवश्यक असते. म्हणूनच न्यायालयातील एका न्यायमूर्तीची असहमतीही अत्यंत महत्त्वाची असते.

“आपण या निष्कर्षाचा पुरेसा पुनर्विचार केला आहे का?”

रोहिणी नदीच्या तीरावरून संविधानाच्या न्यायालयापर्यंत याच संदर्भात भगवान बुद्धांच्या जीवनातील रोहिणी नदीच्या पाण्याच्या वादाची आठवण होते. शाक्य आणि कोलिय यांच्यात रोहिणी नदीच्या पाण्यावरून संघर्ष निर्माण झाला. परिस्थिती युद्धाच्या दिशेने जात होती. शाक्य संघात बहुमत युद्धाच्या बाजूने होते. संख्येने बहुमत एका बाजूला होते. परंतु सिद्धार्थ गौतम एकटे उभे राहिले. त्यांनी युद्धाला विरोध केला. मानवी जीवन, करुणा आणि विवेकाची बाजू घेतली. संख्या त्यांच्या बाजूने नव्हती; परंतु विवेक त्यांच्या बाजूने होता. त्यावेळी ते अल्पमतात होते. पुढे इतिहासाने त्याच सिद्धार्थाला भगवान बुद्ध म्हणून ओळखले.

यातून एक मूलभूत तत्त्व समोर येते - “सत्याला बहुमताची गरज नसते; सत्याला विवेकाची गरज असते.” एखादी व्यक्ती एकटी उभी आहे म्हणून तिचा विचार दुर्बल ठरत नाही. उलट, त्या विचारात सत्य, तर्क आणि मानवतेची शक्ती असेल तर काळ त्याला अधिक व्यापक मान्यता देऊ शकतो. सिद्धार्थापासून बेला त्रिवेदींपर्यंत, रोहिणी नदीच्या वादाच्या वेळी अनेकांच्या संख्येचे बहुमत एका बाजूला होते आणि सिद्धार्थ एकटे होते. आज संविधानाच्या प्रश्नावर सात न्यायमूर्तींच्या घटनापीठात सहा न्यायमूर्ती एका बाजूला होते आणि न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी एकट्या दुसऱ्या बाजूला होत्या. कालचा सिद्धार्थ पुढे भगवान बुद्ध झाला. आजचा अल्पमताचा न्यायमूर्ती उद्या कायद्यातील नव्या विचाराचा आधार बनेलच असे नाही; परंतु त्याचा विचार दुर्लक्षित करता येणार नाही. कारण अल्पमताचा निर्णय हा न्यायालयाच्या अंतिम निकालापेक्षा कमी महत्त्वाचा असतोच असे नाही. न्यायालयीन निर्णयात बहुमताने कायदा निश्चित होतो; परंतु असहमती dissent त्या कायद्याच्या तर्काला, घटनात्मक पायाभूत आधाराला आणि भविष्यातील परिणामांना सतत प्रश्न विचारत राहतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला केवळ बहुमतावर चालणारी व्यवस्था दिली नाही. त्यांनी संविधानाधिष्ठित लोकशाही दिली. लोकशाहीत बहुमताला सत्ता मिळते; परंतु संविधान बहुमतालाही मर्यादा घालते. म्हणूनच संविधानाचे रक्षण करण्यासाठी कधी कधी बहुमताच्या विरोधात उभे राहण्याची गरज निर्माण होऊ शकते. याच अर्थाने न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांचा निर्णय अभ्यासण्यासारखा आहे.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

**अल्पमतातील निर्णयाची गुणवत्ता कशी ठरवायची?**

एखादा निर्णय अल्पमतात आहे म्हणून तो गुणवत्ताहीन ठरत नाही. त्याची गुणवत्ता पुढील कसोट्यांवर तपासली पाहिजे - संविधानाचा मजकूर काय सांगतो? घटनाकारांचा हेतू काय होता? पूर्वीचे न्यायालयीन निर्णय काय सांगतात? न्यायमूर्तींचे तर्क किती सुसंगत आहेत? मूलभूत अधिकारांशी त्यांचा संबंध काय आहे? भविष्यातील घटनात्मक परिणाम काय असतील? या कसोट्यांवर विचार केला तर अल्पमतातील निर्णय हा भविष्यातील न्यायशास्त्रासाठी अत्यंत मौल्यवान दस्तऐवज ठरू शकतो.

**सरकार, न्यायव्यवस्था आणि संविधाननिष्ठ नागरिकांसाठी संदेश :** न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी ई. व्ही. चिनैया प्रकरणातील भूमिका कायम ठेवत अनुसूचित जातींच्या घटनात्मक यादीचे राज्याकडून उपविभाजन करता येणार नाही, असा निष्कर्ष मांडला. हा निर्णय सध्या अल्पमताचा आहे. बहुमताचा 6:1 निर्णय हा न्यायालयाचा निर्णय म्हणून मान्य आणि लागू आहे. परंतु अल्पमताचा निर्णय म्हणून बेला त्रिवेदी यांच्या निर्णयाचे महत्त्व संपत नाही. उलट, सरकारने, न्यायव्यवस्थेने, कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि संविधाननिष्ठ नागरिकांनी त्या निर्णयाचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण घटनात्मक प्रश्नांवर अंतिम मत तयार करण्यापूर्वी बहुमत काय म्हणते याबरोबरच अल्पमत का असहमत आहे हे समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बहुमत निर्णय देते. अल्पमत प्रश्न विचारते. बहुमत कायदा निश्चित करते. अल्पमत त्या कायद्याच्या तर्काची चिकित्सा करते आणि कधी कधी - आजचे अल्पमत उद्याच्या न्यायशास्त्राचा मार्गदर्शक ठरते. म्हणूनच न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांचा निर्णय वाचणे, समजून घेणे आणि त्याची चिकित्सा करणे आवश्यक आहे. कारण संविधानाचे रक्षण नेहमी गर्दीत उभे राहूनच होते असे नाही. कधी कधी एक व्यक्ती, एक विवेक, एक असहमती, आणि एक ठाम घटनात्मक भूमिका संपूर्ण व्यवस्थेला आरसा दाखवू शकते. रोहिणी नदीच्या वादात शक्य संघ बहुमत युद्धाच्या बाजूने होते; सिद्धार्थ शांततेच्या बाजूने एकटे उभे होते. आज सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठात सहा न्यायमूर्तींचे बहुमत एका बाजूला होते; न्यायमूर्ती बेला त्रिवेदी एकट्या दुसऱ्या बाजूला उभ्या राहिल्या. सिद्धार्थ एकटे होते म्हणून त्यांचा विचार छोटा झाला नाही; बेला त्रिवेदी एकट्या होत्या म्हणून त्यांचा घटनात्मक तर्क छोटा होत नाही. बहुमताचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या स्वीकारावा लागतो; परंतु अल्पमताचा विचार समजून घेणे, त्याची चिकित्सा करणे आणि त्यातून संविधानाचा व्यापक अर्थ शोधणे ही सरकारची आणि संविधाननिष्ठ समाजाची जबाबदारी आहे. शेवटी एवढेच.●●

# लोकशाहीतील सत्ता प्रवास
## एक परिचय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते, “जे इतिहास विसरतात, ते इतिहास निर्माण करू शकत नाही”. प्रसिद्ध विचारवंत आणि लेखक विलास गजभीये यांचे ‘लोकशाहीतील सत्ता प्रवास’ या शीर्षकांतर्गत नुकतेच प्रसिद्ध झालेले अतिशय महत्वपूर्ण पुस्तक वाचण्यात आले. डॉ. बाबासाहेबांनी जे सांगितले, त्या दृष्टिकोनातून त्यांनी राजकीय इतिहासाचे स्मरण करून दिले आहे, ते निश्चितच चळवळीतील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. लेखक सद्या दै.बहुजन सौरभ, नागपूर येथे कार्यकारी संपादक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. तसेच अनेक पुरस्कारसुद्धा प्राप्त झाले आहेत. अल्पावधीतच प्रचंड प्रमाणात वाचकांनी त्या पुस्तकाची दखल घेतली आहे, हे त्या पुस्तकाचे यश आहे. लेखक मनोगतात म्हणतात, “लोकशाहीतील ‘सत्ता प्रवास’ हे पुस्तक लिहिताना माझ्या मनात एकच ठाम विचार होता, आपल्या समाजाच्या संघर्षमय इतिहासाची नोंद पुढील पिढ्यांसाठी जतन व्हावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेली सामाजिक, राजकीय आणि वैचारिक चळवळ ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर असंख्य कार्यकर्त्यांचा त्याग, समर्पण आणि निष्ठेची विचार मशाल आहे. यातील अनेक नावे काळाच्या ओघात विस्मृतीत जाऊ लागली आहेत. त्यांना पुन्हा प्रकाशात आणण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.”




शेड्युल्ड कास्ट फेडरेशनपासून रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपर्यंतचा प्रवास हा अत्यंत प्रेरणादायी आणि संघर्षपूर्ण राहिला आहे. या राजकीय वाटचालीतील महत्त्वाच्या घटना, नेत्यांचे योगदान आणि चळवळीचे चढ-उतार यांची नोंद पुस्तकात करण्यात आली आहे. विशेषतः १९५७ चा काळ आंबेडकरी राजकारणाचा सुवर्णकाळ मानला जातो. दादासाहेब गायकवाड, एन. शिवराज, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, यशवंत आंबेडकर, बी. सी. कांबळे, दत्ता कट्टी, मिनाम्बल शिवराज, हरिदास आवळे, जी. के. माने, हरिहरराव सोनुले आदी नेत्यांच्या कार्याचा अभ्यासपूर्ण मागोवा लेखकाने घेतला आहे.

पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान विशेष महत्त्वाचे होते. महाड सत्याग्रह आणि काळाराम मंदिर आंदोलनासह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक महत्त्वाच्या आंदोलनांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. १९३७ मध्ये मुंबई विधानसभेचे सदस्य, १९४६ मध्ये पुन्हा विधानसभेत प्रवेश, १९५७ ते १९६२ लोकसभा सदस्य आणि १९६२ ते १९६८ राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी काम केले. लोकसभेत असताना धर्मांतरविरोधी विधेयकाच्या निषेधार्थ मनुस्मृतीचे पान फाडून त्यांनी निषेध नोंदविला. लेखकाने या घटनेची तुलना १९२७ मधील डॉ. आंबेडकरांच्या मनुस्मृती दहनाशी केली आहे.

एन. शिवराज हे अ. भा. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष आणि अ.भा. रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष होते. लोकसभेतील रिपब्लिकन पक्षाचे नेते तसेच मद्रास महानगरपालिकेचे महापौर म्हणूनही त्यांनी काम केले. रिपब्लिकन पक्षाच्या राजकीय प्रभावाची ही परंपरा पुढे १९६७ पर्यंत राष्ट्रीय पक्षाच्या मान्यतेपर्यंत पोहोचली. मात्र पुढील काळात पक्षातील अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वाच्या चुकीच्या राजकीय धोरणांमुळे त्याची अधोगती झाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही, ही स्थिती आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी वेदनादायक असल्याचे लेखक नमूद करतात.

१९९५ च्या रिपब्लिकन पक्ष ऐक्यानंतर पक्षाला काही प्रमाणात उभारी मिळाली. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे चार खासदार निवडून आले. रा. सू. गवई, रामदास आठवले, ॲड. प्रकाश आंबेडकर आणि प्रा. जोगेंद्र कवाडे हे चार नेते पुढे वेगवेगळ्या राजकीय गटांत विभागले गेले. या राजकीय प्रवासातील आशा, संघर्ष, यश आणि विघटन यांचे चित्र पुस्तकातून स्पष्ट होते. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या राजकीय कारकिर्दीलाही पुस्तकात महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. ते राज्यसभेवर तब्बल अठरा वर्षे होते. डिसेंबर १९६९ ते १९७२ या काळात त्यांनी राज्यसभेचे उपसभापती म्हणून काम केले. अस्खलित इंग्रजी, अभ्यासपूर्ण मांडणी आणि रुबाबदार वक्तृत्वामुळे त्यांनी संसदीय राजकारणात स्वतंत्र ठसा उमटविला. त्यांचे उपसभापतीपद हे कोट्यवधी दलित आणि शोषित समाजासाठी अभिमानाची ऐतिहासिक घटना होती.

लेखकाने पुस्तकाच्या निर्मितीमागील अडचणींचाही उल्लेख केला आहे. युट्यूब आणि डिजिटल माध्यमांच्या काळात पुस्तक प्रकाशित करणे आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक झाले असले, तरी अक्षरांची ताकद कायम राहते, हा त्यांचा विश्वास आहे. संदर्भ, पुरावे आणि इतिहासाचे दस्तऐवजीकरण यासाठी पुस्तकांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही.



पुरुषोत्तम संबोधी
मो.9422803760

त्यामुळे चळवळीच्या इतिहासाचे लेखन आणि प्रकाशन ही जबाबदारी नव्या पिढीने स्वीकारण्याची गरज आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे रिपब्लिकन राजकारणाचा केवळ गौरवशाली इतिहास मांडण्याऐवजी त्यातील ऱ्हासाची कारणे आणि भविष्यातील शक्यतांचाही विचार केला आहे. त्यामुळे हे पुस्तक केवळ व्यक्तिचित्रणांचा संग्रह न राहता आंबेडकरी राजकारणाच्या वाटचालीचे चिंतन करण्याची संधी देते. इतिहासातील चुका समजून घेऊन नव्या पिढीने सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी सक्रिय होणे, हाच या पुस्तकाचा व्यापक संदेश ठरतो. नवीन पिढीने या इतिहासातून प्रेरणा घेऊन सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात सक्रिय होऊन भविष्याला मार्गदर्शक ठरणारे आहे, त्यामुळे प्रत्येक वाचकाने, अभ्यासकाने आवर्जून वाचले पाहिजे, इतके महत्वपूर्ण ऐतिहासिक पुस्तक आहे.●●

**पुस्तकाचे नाव : लोकशाहीतील सत्ता प्रवास**
**लेखक : विलास गजभिये**
**प्रकाशक : अक्षरवन इनोव्हेटिव्ह पब्लिकेशन, भंडारा**
**सहयोग राशी : रु. १०० फक्त**

# मोदींचा ‘मेकअप’, इतिहासाचा ‘मेकओव्हर’ व
## सोशल मीडियाचा आरसा!

भारतीय राजकारणात एक काळ असा होता की प्रधानमंत्री देश चालवत असत; आता एक काळ असा आला आहे की प्रधानमंत्रीची प्रतिमा चालवण्यासाठी संपूर्ण यंत्रणा काम करते, असा टोमणा सोशल मीडियावर सातत्याने मारला जातो. कॅमेरा कुठे आहे, प्रकाश किती आहे, कोणता कोन चांगला दिसतो आणि कोणता संवाद ‘व्हायरल’ होईल, यालाही राजकारणात महत्त्व आले आहे.

नरेंद्र मोदींची देहबोली, भाषणशैली आणि कॅमेऱ्यासमोरील सादरीकरण यावरून सोशल मीडियावर सध्या प्रचंड मीमबाजी सुरू आहे. कालपर्यंत ज्याच्यावर मीम बनवणे म्हणजे राजकीय धाडस मानले जात होते, त्याच नेत्याच्या हातवाऱ्यांपासून चेहऱ्यावरील भावांपर्यंत आता सोशल मीडिया स्वतःची ‘कॉमेडी स्क्रिप्ट’ लिहित आहे. हा बदल केवळ विनोद म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण ज्याला स्वतःची प्रतिमा सर्वांत मजबूत वाटते, त्याच प्रतिमेची खिल्ली सर्वांत वेगाने उडू लागली की राजकारणात काहीतरी बदलत असल्याचा संकेत मिळतो. २०१४ नंतर मोदींच्या राजकारणाची एक महत्त्वाची रणनीती म्हणजे ‘मोदीपूर्व भारत’ आणि ‘मोदीनंतरचा भारत’ अशी मानसिक विभागणी निर्माण करणे. म्हणजे २०१४ पूर्वी देशात काहीच घडले नाही आणि २०१४ नंतरच विकासाचा सूर्य उगवला! या राजकीय कथानकावर सोशल मीडिया आता उलट प्रश्न विचारत आहे, मग स्वातंत्र्यानंतर देश बांधणारे लोक नेमके कोण होते? नेहरू होते, शास्त्री होते, इंदिरा गांधी होत्या, मोरारजी देसाई होते, राजीव गांधी होते, व्ही. पी. सिंग होते, नरसिंह राव होते, देवेगौडा होते, गुजराल होते, अटलबिहारी वाजपेयी होते आणि मनमोहन सिंग होते. प्रत्येकाच्या कारकिर्दीत चुका झाल्या, निर्णयांवर टीका झाली, घोटाळे झाले, राजकीय संघर्ष झाले. पण त्याचबरोबर देशाची संस्थात्मक उभारणी, हरितक्रांती, सार्वजनिक क्षेत्र, अणु व अंतराळ संशोधन, आर्थिक सुधारणा, माहिती-तंत्रज्ञान आणि पायाभूत विकास अशा अनेक क्षेत्रांतही काम झाले. पण आजचा राजकीय ‘मेकओव्हर’ असा आहे की इतिहासातील सर्व रंग पुसून एकच रंग उरवायचा! नेहरूंना दोष द्या, इंदिरांना दोष द्या, राजीव गांधींना दोष द्या, मनमोहन सिंगांना दोष द्या आणि मग आरशासमोर उभे राहून सांगा, ‘देश माझ्यामुळेच वाचला!’ हा राजकीय फॉर्म्युला सोशल मीडियाला मात्र आता विनोदाचा



विषय वाटू लागला आहे. विशेष म्हणजे नरेंद्र मोदी यांनी स्वतः संसदेत पूर्वीच्या प्रधानमंत्र्यांच्या योगदानाचा उल्लेख केला आहे. मग प्रश्न एवढाच, इतिहासाचा सन्मान भाषणात करायचा आणि राजकीय प्रचारात त्याच इतिहासाची धुलाई करायची, हा कोणता ‘नवा भारत’ आहे? मोदी सरकारला आता बारा वर्षे झाली आहेत. एवढ्या प्रदीर्घ काळानंतरही प्रत्येक अपयशासाठी मागच्या सरकारांकडे बोट दाखवणे म्हणजे परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्याने दहा वर्षांपूर्वीच्या शिक्षकाला दोष देण्यासारखे झाले. बारा वर्षे सत्ता तुमची, निर्णय तुमचे, अर्थव्यवस्था तुमच्या हातात, संस्था तुमच्या नियंत्रणाखाली मग उत्तरदायित्वही तुमचेच असायला नको का? सोशल मीडिया याच प्रश्नाचे व्यंगात्मक उत्तर देत आहे. एकेकाळी सोशल मीडिया ‘नॅरेटिव्ह’ तयार करण्याचे हत्यार होता. आता त्याच सोशल मीडियावर नॅरेटिव्हचे पोस्टमार्टम सुरू आहे. भाषणातील विराम, देहबोली, घोषणा, फोटोसेशन आणि राजकीय दावे, सगळ्याचे मीममध्ये रूपांतर होत आहे. सत्ता जेव्हा स्वतःला गंभीर समजते, तेव्हा जनता कधी कधी तिच्यावर विनोद करूनच गंभीर प्रश्न विचारते. याचा अर्थ मोदींचा राजकीय पराभव झाला आहे, असा निष्कर्ष काढणे अर्थातच घाईचे ठरेल. निवडणुकीचा निकाल सोशल मीडिया ठरवत नाही. पण सोशल मीडिया हा समाजातील असंतोष, उपहास आणि बदलत्या मानसिकतेचा आरसा नक्कीच बनू शकतो. आणखी एक गंमत पाहा. ‘अच्छे दिन’ सांगताना कॅमेरा HD असतो; पण बेरोजगार तरुणाच्या हातातील रिकामा फॉर्म मात्र अजूनही ब्लॅक अँड व्हाइट! विकासाच्या जाहिराती रंगीत आहेत; पण शेतकऱ्याच्या प्रश्नांचा रंग कोणता? डिजिटल इंडिया चमकत आहे; पण शिक्षणासाठी फी भरताना गरीब विद्यार्थ्याच्या घरातील दिवा किती वेळ पेटतो? मोठमोठे कॉर्पोरेट कर्जांचे आकडे अब्जावधींमध्ये असतात; सामान्य माणसाचा EMI मात्र महिन्याच्या महिन्याला वसूल होतो. यातूनच सामाजिक प्रश्न अधिक तीव्र होतो. आरक्षणामुळे देशाचे नुकसान झाले, असे म्हणणाऱ्यांनी देशातील मोठ्या आर्थिक घोटाळ्यांकडे, कॉर्पोरेट कर्जबुडव्यांकडे आणि सार्वजनिक पैशाच्या वापराकडेही त्याच चष्म्यातून पाहायला हवे. गरीब विद्यार्थ्याला मिळणाऱ्या काही टक्के आरक्षणामुळे देश धोक्यात येतो, पण हजारो कोटींच्या आर्थिक गैरव्यवहारांवर राजकीय मौन असेल तर त्या मौनाचा हिशेब कोण देणार? आणि म्हणूनच मोदींच्या देहबोलीचा अर्थ ‘सत्ता गेली’ असा काढण्यापेक्षा एक साधा प्रश्न विचारणे अधिक योग्य ठरेल, कॅमेऱ्यासमोरचा मेकअप उतरल्यावर देशाला दिसणारा चेहरा कोणता आहे? इतिहासाचा मेकओव्हर कितीही केला तरी इतिहास बदलत नाही. नेहरूंना पुसून मोदी मोठे होत नाहीत; मनमोहन सिंगांना कमी लेखून मोदींची अर्थव्यवस्था आपोआप महान होत नाही; वाजपेयींची उंची कमी करून कोणाचाही कद वाढत नाही. कारण राष्ट्रनिर्मिती ही एकाच प्रधानमंत्रीची वन-मॅन फिल्म नसते आणि सोशल मीडिया? तो आता टाळ्या वाजवणारा प्रेक्षक राहिलेला नाही. तो कधी समीक्षक आहे, कधी व्यंगचित्रकार आहे, कधी प्रश्नकर्ता आहे आणि कधी आरसा आहे. आरशाची गंमत अशी की त्याच्यावर मेकअप करता येत नाही. चेहरा हसत असला तरी आरसा जे दाखवतो, तेच लोकांच्या लक्षात राहते.●●



प्रा. संध्या राजुरकर
निवासी संपादक

## होऊ उतराई



बैल पोळा आनंदाने
करू सगळे साजरा
मित्र कृषकाचा नंदी
होऊ उतराई जरा
तंत्रज्ञान आता मोठे
नसे वृषभाची सर
मालकास देई धीर
नांगरून भरभर
खांदे वाहूनी थकती
शेक हळद लेपाचा
कृतज्ञता मानू वृषा
सण एक व्हावा त्यांचा
पाठीवरी नवी झूल
गळ्या घुंगरू बांधून
पोळा फुटता गावात
वाजे शहनाई धून
आज श्रावण सरेल
अमावस्या असे खास
वलीवर्द सजताच
पुरणपोळीचा घास
मान दिलाय ऋषभा
राज्य चिन्हाच्या रूपात
वदे सम्राट अशोक
नको प्राणी रक्तपात

–डॉ.शील बागडे

## खापरे खूप झाले



हुजरे खूप झाले, मुजरे खूप झाले,
भीमा तुझ्या नावाने, खापरे खूप झाले...1
विचार तुझे घेऊन, वाटा नवी धरू या,
जातीच्या या भिंतीचे, निखारे खूप झाले...2
शिक्षणाची मशाल घेऊ, अज्ञान दूर करू या,
अंधार पसरवणारे, लुटेरे खूप झाले...3
हक्कासाठी लढताना, ना भीती ना माघार,
अन्याय सहन करण्याचे, बहाणे खूप झाले...4
संविधान हातात घेऊ, समतेची शपथ घेऊ,
धर्मांधतेच्या नावाने, फतवे खूप झाले...5
तू दिलीस आम्हाला जी, स्वाभिमानाची भाषा,
पायाशी झुकणारे हे, चेहरे खूप झाले...6
भीमाच्या विचारांचा, दीप अखंड तेवत राहो,
त्याला विझवणारे हे, अंधारे खूप झाले...7
हुजरे खूप झाले, मुजरे खूप झाले,
भीमा तुझ्या नावाने, खापरे खूप झाले..

–रंगराज गोस्वामी



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225



## स्वातंत्र्यात लाल किल्ला बोले..

स्वातंत्र्यात, लाल किल्ला बोले – दीमागी नक्सल.?
तिरंगा ते संविधान – करे भेदांची कत्तल.!
देशभक्त ते देशनिष्ठा – प्रमाण पत्र वाटे.!
दिवाणा तो मनुचा – दावे संविधानी शक्कल.?
ठेवे,दडपशाही चारही – ते स्तंभ कब्जात.!
लोकशाही हत्या होते – मजल दर मजल.?
चुनावी संहिता बसवे – सारेच धाब्यावर.!
खुल्ले आम जाती धर्म – रुप प्रचारी अस्सल.?
फिक्र,ना बेरोजी महागी – पेपर फुटीचा कहर.!
गुंडाचा,हैदौस करे – राज ते मनी मसल.?
आवाज,विचाराचा की – डीजेची दण दणाट.!
थापडं ती बापटला – धर्मांधाची ना ढक्कल.?
जीझेड जीअल्फा शांती – मार्च प्रश्नांचा प्रहार.!
सतेची पॅलेट गन – मारा हुकमी अक्कल.?
नाना ते नुटके आखे – त्या खुर्ची बचावात.!
मतदान मत मुल्यात – घेई सारी दखलं.?
तिरंगा ते संविधान – करे भेदांची कत्तल.!
स्वातंत्र्यात,लाल किल्ला – बोले दीमागी नक्सल.?

– दिनकर रा मडकवाडे

## पोळा



आज आवतन आहे
उद्या जेवाले रे येजो
तुझी भरतो मी खोर
कोठा भरून तू देजो

सजवा चौरंग पाट
लावा पळसाचा मेळा
साज सजविला सारा
आज बैलांचा रे पोळा

साऱ्या जीवनाची आस
तुझ्या खांद्यावर धुरा
सोबती बळीराजा
तुझा अनमोल हिरा

मातीच करतो सोन
कष्टकर्याची तू शोभा
आखरावर तोरण
राजा लाईनीत उभा

जीला घुंगराचा नांद
वाजे रुमझुम वाजा
घरोघरी तुझी पुजा
तू रयतेचा राजा – –!

–प्रा. नाना शेंडे

# पुरुषांच्या कष्टावर नांगर फिरवणारी यंत्रणा
## अंधश्रद्धा आणि उधळपट्टीची राणी

**सुवाहक कोण? स्त्री :** या समाजात अंधश्रद्धेची सर्वात पक्की ग्राहक आणि सर्वात मोठी एजंट स्त्रीच आहे. पुरुष फॅक्टरीत स्वतःचं रक्त आटवतो, आणि स्त्री मंदिरात इज्जत आणि पैसा दोन्ही आटवते.

**अंश्रद्धेच्या :** लाइनमध्ये कोण उभे आहे? ९० टक्के स्त्रिया च दिसतात. ढोंगी साधू-महात्मांचे ATM कार्ड म्हणजे स्त्री.

बाबा म्हणतो संकट आहे. स्त्री लगेच पर्स उघडते. मुलाला नोकरी लागत नाहीये? २१ हजारांचे अनुष्ठान करा. पती दारू पितो? ११ हजारांची महामृत्युंजय शांती करा. ग्रह खराब आहेत? हा ५० हजारांचा पुखराज (रत्न) वापरा. स्त्री विचारत नाही, बाबा, तुझा मुलगा कुठला कलेक्टर लागलाय? ती थेट म्हणते, महाराज, जो हुकूम.घरात पीठ असो वा नसो, बाबाच्या ताटात ५०० ची नोट आधी जाणार.

**काहीही झाले की स्त्री लगेच मान्य करते :** मूल आजारी = देवी कोपली आहे, बळी द्या. धंदा मंदावला = सव्वा लाखाचे जागरण करा. लग्न होत नाहीये = १६ सोमवार, १६ शुक्रवार, ९ गुरुवार - सर्व करून टाका. पुरुष जर बोलला, एवढा पैसा कुठून येणार? स्त्री उत्तर देते, देव देईल, तुम्ही गप्प बसा. तुम्ही नास्तिक आहात. म्हणजे पुरुषाने कमवून द्यावे आणि स्त्रीने ते उडवून यावे - वरून पुरुषालाच बेईमान म्हणावे.

**देवाला बळी, घर खाली :** नवरात्रीत ९ दिवस फलाहार - ५००० रुपयांची फळे, सुका मेवा. करवा चौथ (किंवा तत्सम व्रते) - ७००० ची साडी, मेकअप, पूजा साहित्य. जागरण - ५०,००० रुपये नवस होता. तीर्थयात्रा - गुरुजींच्या आश्रमात ३०,००० रुपये देणगी. निकाल काय? मुलगा अजूनही बेरोजगार, पती अजूनही दारू पितो, घराचे छप्पर अजूनही गळते. पण पंडा-पुजाऱ्याची नवी गाडी येते, बाबाचा आश्रम अजून दोन मजले वर चढतो. ही आहे कष्टाची राखरांगोळी - मेहनत पुरुषाची, मलाई बाबाची आणि मध्यस्थ स्त्री.

**इतिहासापासून आजपर्यंत - दर तोच, पावती नवी :** आधी सती प्रथा होती - पतीसोबत जळून जा, स्वर्ग मिळेल - स्त्री जळून जायची. मग देवदासी बनली - देवाची सेवा कर - पुजाऱ्याची सेवा करत राहिली. आज आश्रमातली सेवादार बनली आहे - आसाराम, राम-रहीम, नित्यानंद यांची प्रकरणे भरलेली आहेत. प्रत्येक ठिकाणी समान काय? स्त्री आपले तन-मन धन सर्व समर्पित करते. बाबा जेलमध्ये जातो, पण स्त्री तेव्हाही म्हणते, आमचे गुरुजी निर्दोष आहेत.



**सर्वात खतरनाक गोष्ट : पुढच्या पिढीलाही तेच विष पाजते :** आई मुलीला शिकवते - बाळा, व्रत कर, नाहीतर पतीचे आयुष्य कमी होईल. सासू सुनेला धमकावते - आमच्या घरात हे व्रत चालते, तुला करावेच लागेल. म्हणजे स्त्रीच स्त्रीची शत्रू बनून अंधश्रद्धेची फॅक्टरी चालवत आहे. पुरुष बाहेर आहे, पण घराच्या आत धर्माचे पोलीस स्टेशन स्त्री चालवत आहे.

**कडू आहे पण सत्य आहे.**

१. अंधश्रद्धेचा ट्रक जर चालत असेल, तर ड्रायव्हर सीटवर स्त्री बसलेली आहे. २. ढोंगी बाबा-पंडा-पुजाऱ्यांचा धंदा स्त्रियांशिवाय एक दिवसही चालणार नाही. ३. उधळपट्टीचे मशीन स्त्री आहे - सण, वार, उपवास, नवस, बळी - सर्वत्र पैसा पाण्यासारखा वाहतो. ४. पुरुष रक्त-घाम गाळतो, स्त्री त्या घामाच्या पैशातून बाबांचे महाल बांधते. इलाज एकच आहेः स्त्री जोपर्यंत आपली बुद्धी वापरणार नाही, जोपर्यंत देवाच्या भरवशावर बसेल - तोपर्यंत घरे विकली जात राहतील. ज्या दिवशी स्त्री विचारेल, बाबा, तू तुझ्या दुःखासाठी कोणते अनुष्ठान करतोस? त्या दिवशी दुकान बंद होईल. त्याशिवाय नाही. सत्य कडू आहे, पण स्त्रीच्या अंधभक्तीपेक्षा जास्त कडू नाही. अंधश्रद्धा मुर्दाबाद. उधळपट्टी मुर्दाबाद. मी नास्तिक नाही बर परंतु अंधश्रद्धेच्या विरोधात नक्की च आहे. ●●

■ बसौस ■

13 September 2026 page 03-1_Layout 1 12-09-2026 06:12 PM Page 1



# रिपब्लिकन पक्षाचा शेवटचा महापौर तेजराम सोमकुंवर



**म**हामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कोट्यवधी अनुयायांना दिलेला ‘खेडी सोडा, शहराकडे चला’ हा संदेश केवळ एक राजकीय विचार नव्हता, तर शोषित आणि पीडित समाजाला गुलामीच्या गर्तेतून बाहेर काढून स्वाभिमानाचे आयुष्य जगण्याचा आदेश होता. या आदेशाला अंतिम सत्य मानून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजारो तरुणांनी शहराची वाट धरली. याच तरुणांच्या फौजेत एक असा तेजस्वी तारा होता, ज्याने स्वतःच्या कष्ट, निष्ठा आणि चिकाटीच्या बळावर नागपूर शहराच्या इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले. ते नाव म्हणजेच नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर, यशस्वी व्यावसायिक आणि आंबेडकरी चळवळीचे खंदे सैनिक वैद्यराज तेजरामजी सोमकुवर होय. नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील नांदागोमुख या छोट्याशा गावात देवराव सोमकुंवर आणि लुंगसाबाई सोमकुंवर या कष्टकरी दांपत्याच्या पोटी १५ जानेवारी १९३२ रोजी तेजराम यांचा जन्म झाला. पाच मुलगे आणि एका मुलीच्या या कुटुंबाची परिस्थिती साधारण होती. गावातील जनपदकालीन शाळेत त्यांनी उच्च प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. तल्लख बुद्धिमत्ता, उंच व कणखर शरीरयष्टी आणि कष्ट करण्याची तयारी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा त्यांच्यावर बालपणापासूनच प्रभाव होता. गावाच्या मर्यादित चौकटीत राहून प्रगती साधणे कठीण आहे, हे ओळखून त्यांनी तरुण वयात नागपूर गाठले. नागपुरात सुरुवातीचा काळ संघर्षाचा होता. पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ते काम त्यांनी केले. त्या काळात कामठी रोडवरील सिद्धार्थनगर, टेकानाका हा आंबेडकरी चळवळीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू होता. याच परिसरात वास्तव्य करताना त्यांचा चळवळीशी अधिक जवळचा संबंध आला. समता सैनिक दल, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि भारतीय बौद्ध महासभा या संघटनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. बैठका, आंदोलने, मोर्चे आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून त्यांनी स्वतःला चळवळीच्या कामात झोकून दिले. कौटुंबिक जीवनाची सुरुवात झाल्यानंतर जबाबदाऱ्या वाढल्या. खुमारी येथील लीलाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संसाराचा गाडा चालवण्यासाठी त्यांनी सुरुवातीला घरोघरी रॉकेल विक्रीचा व्यवसाय केला. त्यानंतर मोतीबाग रेल्वे वर्कशॉपजवळ छोटे हॉटेल सुरू केले. मात्र, त्यांची महत्त्वाकांक्षा केवळ उदरनिर्वाहापुरती मर्यादित नव्हती. अभ्यासाची आवड असल्याने त्यांनी आयुर्वेदिक पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर गरजू व गरीब नागरिकांवर उपचार करणारे ‘वैद्यराज’ म्हणून त्यांना समाजात आदर मिळाला. याच काळात त्यांचे मित्र पाटणे यांच्या सोन्या-चांदीच्या दुकानात त्यांचा नियमित संपर्क येत असे. तेथून त्यांनी सराफा व्यवसायातील बारकावे आत्मसात केले. प्रामाणिकपणा, व्यवहारकौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी लष्करी बाग, कर्मवीर आवळे बाबू चौक येथे ‘तेजराम अँड कंपनी’ या नावाने सोन्या-चांदीचे दुकान सुरू केले. त्या काळात दलित समाजातील एका आंबेडकरी तरुणाने सराफा व्यवसायात स्वतःचे स्थान निर्माण करणे ही उल्लेखनीय बाब होती. व्यवसायात यश मिळवतानाही त्यांनी सामाजिक बांधीलकी सोडली नाही. तेजराम सोमकुंवर यांची खरी ओळख मात्र रिपब्लिकन कार्यकर्ता म्हणूनच होती. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राजकीय व सामाजिक कार्याचे धडे घेतले. खोब्रागडे गटाचे ते निष्ठावान कार्यकर्ते बनले. पक्षाचा आदेश, आंदोलन किंवा मोर्चा असो, ते नेहमी आघाडीवर असत. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या निधनानंतर नागपुरात खोब्रागडे आणि गवई गटांच्या ऐक्याचा प्रयत्न झाला. या काळात पक्षाच्या उमेदवार निवड प्रक्रियेतही तेजराम सोमकुंवर सहभागी झाले आणि १९८५ च्या नागपूर महानगरपालिका निवडणुकीत ते विजयी झाले. २६ एप्रिल १९८५ रोजी झालेल्या नागपूर महानगरपालिका निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. काँग्रेसचे २६, भाजपचे ११, समाजवादी काँग्रेसचे ९, खोब्रागडे गटाचे ७, गवई गटाचे २ आणि १४ अपक्ष नगरसेवक निवडून आले. रिपब्लिकन पक्षातील फुटीचा परिणाम अनेक ठिकाणी झाला असला तरी आंबेडकरी विचारांचे नऊ नगरसेवक सभागृहात पोहोचले. यामुळे सत्तास्थापनेत रिपब्लिकन पक्ष महत्त्वाचा घटक ठरला. काँग्रेस, अपक्ष आणि खोब्रागडे गटाच्या सहकार्याने महायुतीची सत्ता स्थापन झाली. पक्षातील निष्ठा, सामाजिक कार्य आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊन ३ फेब्रुवारी १९८६ रोजी वैद्यराज तेजराम सोमकुंवर यांची नागपूरच्या महापौरपदी निवड झाली. ते १ फेब्रुवारी १९८७ पर्यंत महापौर होते. त्यांच्या कार्यकाळात नागपूरच्या सार्वजनिक जीवनात रिपब्लिकन पक्षाचा प्रभाव ठळकपणे जाणवत होता. कन्याकुमारीहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्योत नागपुरात आली असता महापौर म्हणून तेजराम सोमकुंवर यांनी तिचे भव्य स्वागत केले. धनवटे रंगमंदिरातील स्वागत सभेत त्यांनी केलेले भाषणही विशेष गाजले. नागपूर शहरातील विविध विकासकामांना त्यांनी चालना दिली. उत्तर नागपुरातील अॅड. सखाराम मेश्राम चौक येथे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. या पुतळ्याचे उद्‌घाटन तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्र पवार आणि रिपब्लिकन नेत्यांच्या उपस्थितीत झाले. रिपब्लिकन पक्षाच्या संघटनात्मक कार्यातही तेजराम सोमकुंवर यांनी योगदान दिले. दत्ता कट्टी यांच्या निधनानंतर जे. ईश्वरीबाई यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे अखिल भारतीय अधिवेशन तामिळनाडूतील सालेम येथे झाले. या अधिवेशनातही त्यांची भूमिका महत्त्वाची होती. पारंपरिक धोतर-बंगाली पोशाखातील त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि साधेपणा नागपूरकरांच्या स्मरणात राहिले. १९८५ ते १९९० हा काळ नागपूरच्या आंबेडकरी राजकारणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यानंतरच्या तीन-चार दशकांत नागपूरच्या महापौरपदावर किंवा स्थायी समितीच्या अध्यक्षपदावर आंबेडकरी पक्षाचा प्रतिनिधी विराजमान होऊ शकला नाही. त्यामुळे सामान्य ग्रामीण कुटुंबातून आलेल्या तेजराम सोमकुंवर यांचा प्रवास विशेष ठरतो. कष्टकरी तरुणापासून वैद्यराज, यशस्वी सराफा व्यावसायिक आणि नागपूर शहराचा प्रथम नागरिक असा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. ‘मी प्रथम आणि शेवटी रिपब्लिकन’ या भावनेने त्यांनी आयुष्यभर काम केले. त्यांचे निधन २ जानेवारी १९९९ रोजी झाले.●●



विलास गजभिये
मो. 9421588901

# मनुस्मृतीची चिकित्सा व्यापक होईल..?




**म**नुस्मृती केंद्रस्थानी आणली जात असल्याचे काँग्रेसचे तसेच लोकसभेतील विरोधी पक्ष राहुल गांधी यांच्या अलिकडच्या काही वक्तव्यातून जाणवते आहे. राहुल गांधी यांनी पुण्यात युवतींशी संवाद साधताना मनुस्मृतीतील ज्या श्लोकाचा संदर्भ दिला त्याचा सर्वसाधारण अर्थ असा होता 'स्त्री बालपणात वडिलांच्या सानिध्यात, तरुणपणात, पतीच्या सानिध्यात आणि म्हातारपणात मुलांच्या सानिध्यात सुरक्षित असते.' पुढे त्यांनी मुलींनी आंदोलनात वापर केलेल्या भाषेवर जो आक्षेप घेण्यात आला त्याचा संदर्भ दिला. पुरुषसत्ताक व्यवस्था मुलांना भाषा, वागणूक याबाबत मोकळीक देते, तर मुलींबाबत संस्कृतीचे दाखले देऊन संकुचित दृष्टिकोनाकडे लक्ष वेधून, दुट्टप्पीपणा स्पष्ट केला. या संदर्भातून एकूणच स्त्रीची स्वतंत्र ओळख पुसल्या गेल्याचे स्पष्ट होते. संरक्षकस्थाने वयानुसार बदलत आली आहेत एवढेच..! त्याचबरोबर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर काही संघटनांनी शुद्धीकरण केले. हा मुद्दा स्वतः खरगे यांनी राज्यसभेत उपस्थित केला होता. त्यावर सभागृह नेते श्री. नड्डा यांनी खेद व्यक्त करून चौकशीची हमी दिली होती. याच संदर्भात खरगे यांनी काँग्रेस पक्षातून याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या नाहीत. याबाबत जाहीर खंत व्यक्त केली होती. त्यानंतर राहुल गांधी यांनी दिल्ली येथील पत्रकार परिषदेतून पॉवरपॉइंटच्या माध्यमातून संबंधितांविरुद्ध एफआयआरची मागणी करून मुद्दा व्यापक स्तरावर चर्चेला आणला. त्याचबरोबर दलितांवर विविध राज्यात होणाऱ्या अत्याचाराचे संदर्भ फोटोग्राफ्सच्या माध्यमातून दिले. त्यानंतर काँग्रेसच्या नेत्यांनी या मुद्द्या विरुद्ध आंदोलने केली. मुळात मनुस्मृतीत नमूद बाबी पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या समर्थक आहेत, सामाजिकदृष्ट्या जाचक आहेत ही बाब याआधीही अनेक समाज सुधारकांनी अधोरेखित केली आहे. ही अशी पुरुषी आणि सामाजिक वर्चस्वाची मानसिकता सर्वच जाती - धर्मात आणि राजकीय पक्षात कायम वर्चस्व ठेऊन आहे. जग अंतराळात संशोधन करीत असताना आपल्या समाजात मनुस्मृतीचे समर्थन आणि उदात्तीकरण करणारा वर्ग आहे. सामाजिक समानता आणखी दूर असल्याचे यावरून अधोरेखित होते. या प्रवृत्ती विरोधात राहुल गांधी ठोस भूमिका घेऊन जनमानसात घुसळण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. एका मोठ्या पक्षाचे नेते असूनही राजकीय फायदा तोट्याचा विचार न करता जातीयतेचा मुद्दा रेटल्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत याबाबत तरी दुमत होऊ नये. मनुस्मृती केवळ महिलांसाठीच जाचक नव्हती तर वर्ण व्यवस्थेतील खालच्या घटकाचे माणूस म्हणून या ग्रंथाने अधिकार, अस्तित्वच नाकारले होते म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाहीररित्या जाळली होती. धर्मांतराचा निर्णय घेऊन मानवतावादी बुद्ध धम्माचा स्वीकार केला. मनुस्मृतीची चिकित्सा आंबेडकरवादी आणि पुरोगामी विचारांचे चिंतक, कार्यकर्ते कायमच करीत आले आहेत. पण, राहुल गांधी यांनी पुण्यातून युवतींशी संवादाच्याद्वारे आणि दिल्लीतील पत्रकार परिषदेतून वैश्विक स्तरावर हा मुद्दा उजागर करण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षनेता म्हणून आता त्यांना गांभीर्याने घेणे माध्यमांना भाग पडते आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अलीकडेच हिंदू धर्मातील एका संप्रदायाने फ्रान्समध्ये उभारलेल्या मंदिराचे लोकार्पण झाले आहे. या स्वामींच्या गटाने आयफेल टॉवर बघण्यासाठी तेथील प्रशासनाला विनंती केली की, स्वामींचा समूह तिथे असतांना महिला आसपास नसाव्यात. संबंधित कंपनीने त्यांची विनंती मान्य केली. महिलांना नियमित जागेशिवाय दुसऱ्या विभागात काम दिले. याची जेंव्हा बातमी बाहेर आली तेंव्हा काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी एक दिवस आंदोलन केले. फ्रान्सच्या नेत्यांनी या घटनेचा निषेध करून हा महिलांचा अपमान असल्याचे म्हटले. जगभरातून या विरोधात पडसाद उमटू लागले. संबंधित संप्रदायाच्या (BAPS)वतीने माफी मागितली गेली. मूळ मुद्दा महिलांचा, त्या परंपरांचे ओझे कायमच वाहत आल्या आहेत. असे का? हा प्रश्न कधीच उपस्थित न केल्यामुळे त्यांच्यावरची बंधन अधिक घट्ट आणि जाचक होत गेली आणि त्या अधिक बंदिस्त होत गेल्या. स्त्री वर्गाला अनेक बंधनात अडकवून ठेवल्या गेले. त्यांच्या वैचारिक दृष्टिकोनाला फारसे अवकाश या व्यवस्थेत प्राप्त होऊ शकले नाही. याला स्त्री चळवळीतील कार्यकर्त्या अपवाद निश्चित आहेत, ती त्यांनी बंडखोरी केली म्हणून..! त्यांच्या प्रयत्नांना स्त्री वर्गाचे मात्र व्यापक समर्थन मिळू शकले नाही हे सुद्धा आपल्या लक्षात येते. आता ज्या युवती, मुली जेन अल्फा - झी या गटात मोडतात त्यांच्यापर्यंत हा विचार पोहोचेल काय? साधनांची उपलब्धता असली तरी त्याची विवेक बुद्धीने चिकित्सा करण्यासाठी सरसावतील काय? झालेल्या अन्यायाविरुद्ध जाहीर भूमिका घेतील काय? बंधन झुगारण्याचे धाडस दाखवतील काय? हे बघणे औत्सुक्याचे आहे. मनुस्मृतीची चिकित्सा करून, त्यातील रूढींना संवैधानिक तरतुदीतून नकार देण्याचे धैर्य युवतींनी दाखवले तर ते जातिभेद निर्मूलन, पुरुषसत्ताक व्यवस्थेचे निर्दालन आणि संविधानाला अपेक्षित समतेच्या दिशेने टाकलेले पाऊल असेल. त्यासाठी मनुस्मृतीची चिकित्सा व्यापक होईल की नाही यावरच याबाबी निर्भर आहेत.●●



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मराठीचे विद्यापीठ स्व. प्रा. शं. क. कापडणीस



**ना**शिक जिल्ह्यातील सटाणा महाविद्यालयातील मराठीचे सेवानिवृत्त प्राध्यापक आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मराठीचे विद्यापीठ साहित्यिक प्रा. शं. क. कापडणीस यांचे नुकतेच 30 ऑगस्ट रोजी रात्री साडे अकरा वाजता निधन झाले.

मूळचे सटाणा तालुक्यातील द्याने गावचे ते रहिवासी. शेतकरी कुटुंबात जन्माला येऊनही विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि मराठा विद्या प्रसारक संस्थेत शिक्षणाधिकारी म्हणून काम केलेले ग्रामीण साहित्यिक होत. त्यांनी महाविद्यालयात शिकवताना मराठीत विद्यार्थी आणि अनेक साहित्यिक घडवले. महाविद्यालयात कविता शिकवताना ते एका विशिष्ट लयीत गायचे. कविता ऐकण्यासाठी इतर शाखाचे विद्यार्थीही त्यांच्या वर्गात जाऊन बसत. 1977 ते 1980 चा काळ असेल, सर आमच्या घराला लागूनच राहत असत. माझेही वडील त्याच महाविद्यालयात नोकरीस असल्याने आमचे कौटुंबिक संबंध होते. तसा मी आठवी नववी पासूनच कविता लिहायचो. प्रारंभी मराठा हायस्कुलचे आमचे मुख्याध्यापक एन. व्ही. अहिरे यांनी प्रोत्साहन दिल्याने मी कविता लिहू लागलो. सर शेजारी असल्याने त्यांना दाखवू लागलो. सर त्यावर संस्कार करीत. सरांनी दिलेल्या दिलेल्या पत्यावर मासिकांना कविता पाठवू लागलो. वेगवेगळ्या दिवाळी अंकात माझ्या आणि मित्र प्रताप लोके आमच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यानंतर महाविद्यालयात अकरावीत गेल्यापासून प्रा. कापडणीस सर आणि आम्ही विद्यार्थी विविध साहित्य संमेलनाना हजेरी लावू लागलो. विजय तेंडुलकर, दया पवार, यांच्या सारख्या साहित्यिक लोकांशी त्यांच्यामुळे ओळखी झाल्या. 1980 ते 1982 चा तो काळ असेल. मराठीचे प्रा. शरद देशमुख यांच्या ग्रासलेला सूर्य कविता संग्रहाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यावेळी त्यांचा घरगुती सत्कार केला. यावेळी प्रा. एकनाथ पगार, सुधीर देवरे, संजय कापडणीस, प्रा. दिलीप धोंडगे, प्रा. शहा, डॉ. मोहन माजगावकर, प्रा. लीला कुलकर्णी, प्रा. सर्वोत्तम कुलकर्णी आम्ही कधी कापडणीस सरांच्या घरी कधी डॉ. स्व. माजगावकर यांच्या निवासस्थानी कविता वाचन करीत असू. त्यातून मग साहित्यायन ही संस्था जन्माला आली संस्थेत कवी कुसुमाग्रज नियमित हजेरी लावत. संस्थेने सरांच्या मार्गदर्शनाखाली विविध साहित्य संमेलने घेतली. प्रा. कापडणीस सरांच्या मार्गदर्शनाने माझा वेदना काव्यसंग्रह आणि डॉ मोहन माजगावकर यांचा अनाहुत, प्रा. एकनाथ पगार यांचा कालाय असे काव्य संग्रह प्रसिद्ध झाले. महाविद्यालयात माझे वडील सरांवर चिडत. माझ्या मुलाला तुम्ही का बिघडवता? असे म्हणून तक्रार करायचे, परंतु माझ्या वेदना काव्य संग्रहाला राज्य शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा पुरस्कार जाहीर झाला त्यावेळी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे हस्ते पुरस्कार स्वीकारण्यासाठी माझ्या बरोबर वडील आणि प्रा. कापडणीस सर जेव्हा मुंबईला आले त्यानंतर वडिलांनी त्यांना कधी माझ्या मुलाला का बिघडवता असे म्हटले नाही. त्यानंतर प्रा. कापडणीस यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली सर्व पुस्तके मला भेट देत मीही माझा वेदना संग्रह प्रा. कापडणीस सरांना अर्पण केला. त्यावेळी त्यांना भरून आले. सर मालेगावी काही पुस्तकांचा गठ्ठा घेऊन आले. चल आपल्याला ही मालेगावच्या वाचनालयांना द्यायची म्हणाले. मग आम्ही भावसार, काकाणीसह सर्व वाचनालयाना दिली. सरांनी शबनममधून बिल बुक काढून त्यांना रीतसर पावतीही दिली. नाशिक जिल्हा साहित्यिक मेळाव्यात सर आम्हाला घेऊन जात संमेलनात मला कवी गोविंद पारितोषिक मिळाले आणि पिंपळनेर महाविद्यालयातील राज्यस्तरीय महाविद्यालयीन काव्य स्पर्धेत मला प्रथम आणि लोकेसह विभागून फिरती ढाल मिळाली. त्यावेळी सरांनी आमचे केलेले कौतुक विसरता येणार नाही. माझ्या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाल्याने प्राचार्य व्ही. एम. पाटील, प्रा. कापडणीस यांनी माझ्या वडिलांच्या उपस्थितीत महाविद्यालयात माझा सत्कार केला. मलाच नाही तर असे अनेक विद्यार्थी आणि साहित्यिक सरांनी घडवले. मराठीचे प्रा. शरद देशमुख यांची सिन्नर महाविद्यालयात बदली होती. तेथे त्यांनी साहित्य रस्सास्वाद नावाची संस्था मंडळ काढले. त्यांनी घेतलेल्या संमेलनासाठी आम्ही गेलो. रात्री उशिरापर्यंत काव्यवाचन झाले. आपल्या सटाणा येथील साहित्यायनचा सदस्य सिन्नरला साहित्य सेवा करीत आहे. आपण सर्व गेले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. प्रा. कापडणीस यांची ग्रंथसंपदा :- आषाढधारा काव्यसंग्रह :- पाझर, सारणीचे पाणी, सांज किरणे, झळा आणि धारा, देव यशवंतायन आदी कविता संग्रह, तर बागलाण इतिहास दर्शन, चिंतन सरिता, गुंफियेला शेला, प्रकाशाची फुले, आठवाचे आकाश, (ललित लेख संग्रह) अहिराणीचा संसार (लोकम्हणी) स्मृती मंदिरातील सोनेरी दिवे (व्यक्ती चित्रण), थेंब अमृताचा गौरव ग्रंथ, संध्या अभंग, काव्य किनारा आदी पुस्तके त्यांनी लिहिली. प्रा. शं. क. कापडणीस सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.●●



शफीक शेख
मो. 9420588366

# अतूट ऋणानुबंध प्रभातकार कोठारी अन् डॉ. आंबेडकर

**सत्यशोधक चळवळीतील प्रमुख नेते वालचंद कोठारी आणि बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट नागपुरात झाली. त्यानंतर उभयतात कौटुंबिक प्रेमाचे, जिव्हाळ्याचे मधुर संबंध निर्माण झाले. आज, १३ सप्टेंबर प्रभातकार वालचंद रामचंद्र कोठारी यांची १३४वी जयंती त्यानिमित्ताने...**



**पु**ण्यश्लोक वालचंद कोठारी हे सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीतील एक प्रमुख नेते होते. त्यांचा जन्म १३ सप्टेंबर १८९२ रोजी सोलापूर जिल्ह्यात बावी येथे झाला. बावी सोलापुरात शेटफळ या मुख्य गावापासून ४५ कि.मी. अंतरावर कुर्डुवाडी रोडवर वसलेले छोटेसे खेडेगाव आहे. ‘शेटफळ बावी’ असे त्यास म्हटले जाते. हे गाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहचारिणी त्यागमूर्ती रमाई यांच्या पावन पदस्पर्शाने आणि वास्तव्याने उजळून निघाले.

वालचंद कोठारी १९१२ मध्ये बीए झाले. इतिहास आणि अर्थशास्त्रातून विद्यापीठात पहिले आले. त्या काळात विद्यापीठाच्या परीक्षेत उत्तम यश मिळवलेले पदवीधर आयसीएस होण्यासाठी पाश्चात्त्य देशाची वाट धरायचे. त्या मार्गाने न जाता कोठारींनी स्वतःला सामाजिक कार्याला वाहून घेण्याचा संकल्प सोडला. १९१३ ते १९१४ या दोन वर्षात त्यांनी चार कादंबऱ्या लिहिल्या. ‘जागरूक’ साप्ताहिक सुरू करून पत्रसृष्टीत प्रवेश केला. जागरूकसोबतच ‘डेक्कन रयत’, ‘राष्ट्रमत’, ‘प्रभात’ आणि ‘पूना डेली न्यूज’ ही वृत्तपत्रे चालवली. मात्र ते खऱ्या अर्थाने ‘प्रभात’कार म्हणून नावारूपास आले. साहित्य, इतिहास, कला, काव्य, नाट्य, नृत्य, संगीत, आरोग्य, भारतीय तत्त्वज्ञान, प्राचीन ग्रीक आणि रोमन साम्राज्याचा इतिहास, शिवचरित्र असा त्यांचा साहित्यिक प्रपंच होता. ‘लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट’, ‘लॉ ऑफ इव्हिडन्स’ आणि ‘लॉ ऑफ ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी’ अशा कायदेविषयक तीन पुस्तकांचेही त्यांनी लेखन केले. त्याचकाळात ३१ मे ते १ जून १९२० रोजी नागपुरात अ.भा. बहिष्कृत समाज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते. त्याचप्रमाणे वालचंद कोठारी हेही या परिषदेला आवर्जून उपस्थित होते. परिषदेत पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी समाजप्रबोधनपर भाषण केले. पूर्वीपासूनच त्यांचा अस्पृश्यांच्या चळवळीशी संबंध आला. विशेषतः शिवराम जानबा कांबळे यांच्याबरोबर मिळून त्यांनी ‘डिप्रेस्ड क्लासेस कमिटी’ नावाची संस्था काढून वि. रा. शिंदे यांच्या मिशनला पर्यायी संस्था उभारली होती. हजारो लोकांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या नागनगरीच्या या परिषदेत पहिल्यांदा वालचंद कोठारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय झाला. तो सुवर्णदिन... ओळखीच्या पायरीवर, इतिहास घडविणारा, दोन महान विचारसरणीचा संगम, सुधारक आणि क्रांतिसूर्य यांच्या ऐतिहासिक भेटीतून नागपुरातून एक गोड सुरवात झाली. कालांतराने उभयतात अत्यंत घनिष्ठ आणि कौटुंबिक संबंध निर्माण झाले. वालचंद कोठारी यांची बावी या जन्मभूमीत दहा एकर शेती होती. जमिनीच्या वादासंदर्भात त्यांची एक केस डॉ. बाबासाहेबांनी माढा न्यायालयात स्वतः उपस्थित राहून लढविली होती. डॉ. बाबासाहेबांच्या जोरदार युक्तिवादाने निकाल कोठारी यांच्या बाजूने लागला. ते डॉ. बाबासाहेबांना म्हणाले, ‘तुमची फी किती द्यायची?’ यावर डॉ. बाबासाहेब त्यांना मोलाचा सल्ला देत म्हणाले, ‘तुझ्या गावाजवळ मोडनिंब येथे एक हायस्कूल आहे. तेव्हा तू तुझ्या शेतामध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह चालू कर.’ डॉ. बाबासाहेबांच्या आग्रहास्तव कोठारी यांनी पुढे स्वतःच्या जमिनीवर वसतिगृह सुरू केले.

त्यागमूर्ती रमाई आजारी असताना त्यांना विश्रांतीची आत्यंतिक गरज होती. अशा धीरगंभीर वातावरणात सोलापूर जिल्ह्यातील शेटफळ बावी येथील वालचंद कोठारी यांच्या शेतात उभारण्यात आलेल्या मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात रमाईंना तब्बल एक महिना विश्रांतीसाठी ठेवण्यात आले होते. त्यावेळी सोलापुरातील सामाजिक कार्यकर्ते आणि अनुयायी रमाईंना भेटायला यायचे. त्यांची आस्थेने, सहानुभूतीने विचारपूस करायचे. कोठारींसह भोळ्या-भाबड्या जनतेला आपल्या उद्धारकर्त्याचे दर्शन घडले आणि जीवनाचे सार्थक झाले असे वाटायचे. डॉ. बाबासाहेब रमाईंना भेटण्यासाठी आणि त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी अधूनमधून तिथे येत असत. या भेटीदरम्यान डॉ. बाबासाहेब स्वतः काही दिवस कोठारी यांचे कौटुंबिक पाहुणे म्हणून त्यांच्या मळ्यात राहिले होते. त्यावेळी कोठारी यांनी डॉ. बाबासाहेब आणि मातोश्री रमाई यांची अतिशय आपुलकीने काळजी घेतली होती. या संकटकाळात कोठारी कुटुंबाने दिलेल्या आधारामुळे दोन्ही कुटुंबांतील घरगुती ऋणानुबंध अधिक घट्ट झाले. या कौटुंबिक संबंधांशिवाय कोठारी यांनी त्यांच्या 'प्रभात' वृत्तपत्राच्या माध्यमातून आणि सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते म्हणून डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक कार्यास आणि दलितांच्या हक्कांच्या लढ्याला नेहमीच सक्रिय पाठिंबा दिला होता. वालचंद रामचंद्र कोठारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात सामाजिक चळवळींच्या माध्यमातून अत्यंत जवळचे आणि जिव्हाळ्याचे मधुर संबंध होते. वालचंद कोठारी हे महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे एक महत्त्वाचे नेते आणि थोर विचारवंत होते. जयंतीनिमित्त कोटी कोटी नमन.●●



मिलिंद मानकर
मो. 8177866397

# हे भारतराष्ट्र आहे : संवैधानिक, समतामूलक भारताच्या शोधाचा काव्यात्मक प्रवास

**भा**रत राष्ट्र म्हणजे भारताच्या भौगोलिक सीमांमध्ये राष्ट्राच्या विविध धर्म, जाती, भाषा, संस्कृती आणि प्रदेशांच्या लोकांनी समान नागरिकत्व, संविधान, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या आधारावर निर्माण केलेला राजकीय-सामाजिक समुदाय. भारताची विशेषता म्हणजे येथे एकच धर्म, एकच भाषा किंवा एकच संस्कृती असणे नव्हे, तर विविधतेतून एकता निर्माण होणे ही आहे. भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेत भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य म्हटले आहे. त्यामुळे आधुनिक भारतीय राष्ट्राची ओळख धार्मिक किंवा जातीय आधारावर नव्हे, तर संविधानिक मूल्यांवर आधारित नागरिक राष्ट्र म्हणून करणे अधिक योग्य ठरते. सोप्या शब्दात सांगायचे तर देश म्हणजे मुख्यतः भौगोलिक प्रदेश आणि त्याची राजकीय व्यवस्था, तर राष्ट्र म्हणजे त्या प्रदेशातील लोकांमध्ये निर्माण झालेली सामूहिक राष्ट्रीय भावना, समान नागरिकत्वाची जाणीव आणि एकात्मतेची भावना. म्हणून भारत हा केवळ भौगोलिक प्रदेश नसून संविधानाच्या मूल्यांनी जोडलेला विविधतेने नटलेला नागरिकांचा राष्ट्रसमूह आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या संदर्भात पाहिले तर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता याशिवाय भारताचे खरे राष्ट्र निर्माण पूर्ण होऊ शकत नाही. जाती, धर्म, भाषिक किंवा प्रादेशिक भेदांपेक्षा भारतीय नागरिकत्वाची समान भावना अधिक मजबूत होणे आवश्यक आहे. म्हणूनच मार्शल संजय ओरके यांचा ‘हे भारतराष्ट्र आहे’ हा काव्यसंग्रह वाचताना या नावामागच्या जीवनजाणिवा प्रकर्षाने जाणवतात. ‘आक्षेप’ या रचनेत कवी लिहितात, “मैदानावरची टीम प्यावेलियनमध्ये बसलेल्या ‘संघ’ व्यवस्थापनाकडून टिप्स घेऊन मैदानावरचे घेत असते निर्णय”. या ओळींतून सत्तेच्या पडद्यामागील नियंत्रणावर उपरोधिक भाष्य केले आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांबरोबरच सक्षम विरोधी पक्ष असणे आवश्यक असताना निर्णय घेण्याच्या स्वायत्ततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे कवी दाखवतात. ‘जाणीव’ या कवितेतील “तुझ्या डोळ्यातील एकाच थेंबाने महाडच्या तळ्यावर जाणिवांचा आला पूर, पाणीही चवदार झाले तेव्हापासूनच” या ओळींतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाड सत्याग्रहाचा संदर्भ येतो. चवदार तळ्याचे पाणी हे केवळ पाणी नव्हते, तर मानवी हक्क, स्वाभिमान आणि सामाजिक समतेचे प्रतिक होते. डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाने वंचित समाजात आत्मभान आणि संघर्षाची जाणीव निर्माण केली, हा या कवितेचा गाभा आहे. ‘नथुराम’ या रचनेत कवी हिंसा, सत्तेचे संरक्षण आणि न्यायव्यवस्थेतील दुहेरी निकषांवर प्रश्न उपस्थित करतात. “नथुराम पोलीस संरक्षणात झाडतो गोळ्या...” या प्रतिमेतून हिंसेला मिळणारे संरक्षण आणि दुसऱ्या बाजूला जातीय अन्यायामुळे मंदिराच्या पायरीवरही वंचित राहणारा माणूस यातील विसंगती अधोरेखित होते. “हा ‘मूकनायक’ वाट पाहतोय तुझी सन्मानाच्या भारत राष्ट्रासाठी!” या आवाहनातून समता, न्याय आणि बंधुतेवर आधारित भारताची संकल्पना पुढे येते. कवीच्या कवितेत बुद्ध आणि बोधिवृक्षाचे संदर्भही महत्त्वाचे आहेत. “काषाय काळीज घेऊन भरारणारी पाखर बोधिवृक्षावर विसावतात...” या ओळी करुणा, प्रज्ञा, त्याग आणि प्रबोधनाचे प्रतीक बनतात. ‘अबोल प्रेतागत’ ही प्रतिमा सामाजिक अन्यायाविरुद्ध न बोलणाऱ्या, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव हरवलेल्या माणसाचे चित्र उभे करते. बुद्धांचा धम्म आणि डॉ. बाबासाहेबांचे विचार कवीला आत्मभान, स्वाभिमान आणि प्रश्न विचारण्याची शक्ती देतात. ‘साक्रेटिस’ या कवितेत आधुनिक विज्ञान आणि अंधश्रद्धेतील विरोधाभासावर कवीने तीक्ष्ण प्रहार केला आहे. “वैज्ञानिकांच्या पिढ्या उतरत आहेत मंगळावर, लॅपटॉप, लिंबू आणि मिरच्या घेऊन...” या प्रतिमेतून तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकाची प्रगतीही आवश्यक असल्याचे कवी सांगतात. मंगळावर पोहोचलेला समाज विचारांच्या पातळीवर मात्र अंधश्रद्धेत अडकला असेल तर ही प्रगती अपुरी आहे. “चरथं भिक्खवें...” या संदर्भातूनही कवी प्रस्थापित प्रवाहाच्या विरोधात जाण्याची भूमिका मांडतात. निरंजनेच्या प्रवाहाविरुद्ध वाहणारे भिक्षापात्र हे रूढी, अंधश्रद्धा आणि विषमतेच्या प्रवाहाला छेद देणाऱ्या बुद्धविचाराचे प्रतिक ठरते. परिवर्तनासाठी प्रवाहाबरोबर वाहून जाण्याऐवजी त्याच्या विरोधात उभे राहण्याचा संदेश यातून मिळतो. ‘भूमिका’ या रचनेत “भारत राष्ट्र स्वतः प्रत अर्पण केल्यानंतरही तथाकथित राष्ट्रभक्तांनी सातत्याने हिंदुस्थान म्हणून बिनदिक्कत कायद्याचा केला अनादर” या ओळींतून घटनात्मक भारताची ओळख आणि तिच्यावर लादल्या जाणाऱ्या धार्मिक-सांस्कृतिक ओळखीतील संघर्ष अधोरेखित केला आहे. तर ‘प्रेरणा’मधील “आपल्या झऱ्यांचे स्त्रोत लुंबिनी वनातून आलेले आहे, हे विसरू नये आपण” या ओळी बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा, समता आणि मानवतावादी वारशाशी जोडलेल्या भारतीय जीवनप्रवाहाची आठवण करून देतात. मार्शल संजय ओरके यांच्या ‘हे भारतराष्ट्र आहे’ या कवितासंग्रहात 89 कविता आहेत. मध्यमा प्रकाशन, नागपूरद्वारे हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. या कवितासंग्रहातील कविता माणसाला जात, धर्म, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेच्या बेड्यांतून मुक्त करून बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, न्यायाच्या विचारांकडे घेऊन जातात. महाडच्या चवदार तळ्यापासून बोधिवृक्षापर्यंत, लुंबिनीपासून संविधानापर्यंत आणि वैज्ञानिक प्रगतीपासून सामाजिक विवेकापर्यंतचा हा प्रवास आहे. प्रस्थापित अन्यायाच्या प्रवाहात वाहून न जाता त्याच्या विरोधात उभे राहण्याचे आवाहन या कवितासंग्रहातील कविता करतात. तिच्या केंद्रस्थानी असा भारत आहे जिथे राष्ट्रभक्ती म्हणजे केवळ घोषवाक्य नव्हे, तर संविधानाचा सन्मान, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता, बंधुता, न्याय आणि प्रत्येक माणसाच्या सन्मानाचे रक्षण आहे. थोडक्यात सांगायचे तर हा कवितासंग्रह बुद्धापासून डॉ. बाबासाहेबांपर्यंत आणि महाडपासून संविधानापर्यंतचा समतामूलक भारताच्या शोधांचा काव्यात्मक प्रवास आहे.●●






सरिता सातारडे
मो. 8308853051

**कवी : संजय ओरके**
**मूल्य : 175/-**
**मध्यमा प्रकाशन, नागपूर.**

रविवार १३ सप्टेंबर २०२६
Sunday 13 September 2026

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# ऋतुषा जांभुळकरला रॉयल ब्लू बेल्ट



**नागपूर :** श्री गुरु गोविंद सिंग एज्युकेशनल इनस्टिट्यूट ज्युनियर कॉलेजच्या इयत्ता नववीची विद्यार्थिनी ऋतुषा रुपलता चंद्रशेखर जांभुळकर हिला शोतोकान कराटे इंटरनॅशनल ऑफ इंडियातर्फे वार्षिक बेल्ट ग्रेडेशन परीक्षेत रॉयल ब्लू बेल्ट प्रदान करण्यात आला. ऋतुषा गेल्या दीड वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृह परिसरात शिहान कृष्ण भलावी यांच्या मार्गदर्शनाखाली कराटे प्रशिक्षण घेत आहे. तिने विविध कराटे स्पर्धांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविला असून, २०२४-२५ मध्ये शालेय खेळांच्या स्पर्धेत शाळेला टॉप-८ मध्ये स्थान मिळवून दिले. यावर्षी ती वार्षिक शालेय खेळांमध्ये शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच उत्तर प्रदेशातील आग्रा येथे होणाऱ्या पहिल्या एलिट कराटे कप स्पर्धेत किंग्स स्पोर्ट्स अकादमीच्या टीमतर्फे सहभागी होणार आहे. ऋतुषाच्या यशाबद्दल श्री गुरु गोविंद सिंग एज्युकेशनल इनस्टिट्यूट ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अमिता शुक्ला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनचे अध्यक्ष शशिकांत हुमाणे, कोषाध्यक्ष बी. टी. वाहणे, तसेच तिची आई रूपलता जांभुळकर आणि वडील चंद्रशेखर जांभुळकर यांनी शुभेच्छा दिल्या. ऋतुषाने आपल्या यशाचे श्रेय किंग्स स्पोर्ट्स अकादमीचे संस्थापक शिहान कृष्णा भलावी, त्यांच्या टीमचे अधिकारी आणि सेंसेई विदिशा भैंसारे यांना दिले.

# प्रकाशनाथ पाटणकर यांना पहिला 'नागोराव पाटणकर जीवनगौरव पुरस्कार'

## रिपब्लिकन मूव्हमेंटतर्फे ३ ऑक्टोबरला पुरस्कार प्रदान सोहळा



**नागपूर :** आंबेडकरी विचार आणि चळवळ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या लोकप्रबोधनकारांचा गौरव करण्याच्या उद्देशाने रिपब्लिकन मूव्हमेंटतर्फे 'सम्राट नागोराव पाटणकर जीवनगौरव पुरस्कार' सुरू करण्यात आला आहे. या पुरस्काराचा पहिला मान प्रसिद्ध लोकगायक प्रकाशनाथ पाटणकर यांना जाहीर करण्यात आला आहे. सम्राट नागोराव पाटणकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी एका ज्येष्ठ आंबेडकरी प्रबोधनकाराला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रकाशनाथ पाटणकर हे नागोराव पाटणकर यांचे पुत्र असून, लोकप्रबोधनाच्या क्षेत्रात त्यांनी वडिलांचा वारसा समर्थपणे पुढे नेला आहे. महाराष्ट्राच्या धम्मभूमीत प्रसिद्ध असलेल्या आंबेडकरी चळवळीचे गायक म्हणून ओळखले जाणारे प्रकाशनाथ पाटणकर यांनी आपल्या लोकगीतांमधून आणि प्रबोधनातून आंबेडकरी विचारांचा प्रचार-प्रसार केला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची पहिल्या जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे रिपब्लिकन मूव्हमेंटचे अध्यक्ष नरेश वाहाणे यांनी सांगितले. या पुरस्काराचा प्रदान सोहळा ३ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. नागोराव पाटणकर यांच्या प्रबोधनाचा वारसा पुढे नेणाऱ्या प्रकाशनाथ पाटणकर यांचा गौरव हा आंबेडकरी लोककलेच्या आणि प्रबोधनाच्या परंपरेचा सन्मान ठरणार आहे.

# बुद्ध विहार समन्वय समितीची विशेष सर्वसाधारण सभा रद्द

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीच्या वतीने रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा काही अपरिहार्य कारणांमुळे रद्द करण्यात आली आहे. समितीच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन समितीचे सचिव ए. के. पाटील यांनी केले आहे. सभेची पुढील तारीख व वेळ याबाबतची माहिती नंतर कळविण्यात येणार असल्याचेही समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.



# नालासोपारा (पूर्व) येथे 'वर्षावास' निमित्त व्याख्यान



**नालासोपारा :** बौद्धजन पंचायत समिती गट क्रमांक ३६ अंतर्गत शाखा समन्वय समिती आणि बौद्धाचार्य संघ, यांच्या संयुक्त विद्यमाने 'वर्षावास प्रवचन' मालिकेतील दुसरे पुष्प रविवार दि. ६/९/२०२६ रोजी सायं ७ वा. दुबे हॉल, नालासोपारा (पूर्व) येथे पार पडले. हा कार्यक्रम बौ .पं. समिती गट क्रमांक ३६ चे गट प्रतिनिधी अजित खांबे यांच्या उपस्थितीत आणि समन्वय समितीचे अध्यक्ष किशोर खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सदर कार्यक्रमाचे संचालन समन्वय समितीचे सरचिटणीस कमलाकर जाधव यांनी केले तर या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रफुल्ल पुरळकर यांनी 'लेणी संवाद - कोकणातील अपरिचित लेण्यांशी' या विषयावर व्याख्यान देऊन श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले. आपल्या व्याख्यानातून प्रफुल्ल पुरळकर यांनी कोकणातील परिचित तसेच अपरिचित बौद्ध लेण्या, प्राचीन व्यापारी मार्ग, सागरी व्यापार आणि लेण्यांचे ऐतिहासिक महत्त्व यावर प्रकाश टाकला. पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील विविध लेण्यांची माहिती देताना त्यांनी या लेण्यांचा प्राचीन व्यापारी व दळणवळणाच्या मार्गांशी असलेला संबंध स्पष्ट केला. विशेषतः अलिबागजवळील चौल येथील वाघजाई देवी लेणी मंदिर, हिंगुलजा देवी लेणी मंदिर तसेच उरण परिसरातील लेण्यांची माहिती देताना चौलचे प्राचीन व्यापारी व सागरी महत्त्व, विविध ऐतिहासिक कालखंड आणि व्यापारमार्गांच्या अनुषंगाने लेण्यांची झालेली निर्मिती याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले. या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून कोकणातील अनेक अपरिचित लेण्या, त्यांचा इतिहास, बौद्ध वारसा आणि सांस्कृतिक महत्त्व यांची उपस्थितांना नव्याने ओळख झाली. लेणी केवळ धार्मिक स्थळे नसून त्या प्राचीन समाजजीवन, व्यापार, प्रवास आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीच्या महत्त्वपूर्ण साक्षीदार आहेत, हा दृष्टिकोन पुरळकर यांनी आपल्या मांडणीतून अधोरेखित केला.

या कार्यक्रमाकरिता सर्व शाखा, बौद्धाचार्य संघ आणि समन्वय समितीचे प्रमुख संघटक अशोक कांबळे-शेर्पेकर, मंगेश मर्चंडे, सुरेश कांबळे - ऐणारकर, आशिष शिर्के, बौद्धाचार्य मोरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### प्रणोती कळमकर यांना राज्यस्तरीय लेखन गौरव पुरस्कार

**नागपूर :** माय मराठी नक्षत्र प्रतिष्ठानच्या सदस्या प्रणोती हरिश कळमकर यांना ग्लोबल फाउंडेशन, पुणे यांच्यावतीने उत्कृष्ट लेखन कार्यासाठी 'राज्यस्तरीय लेखन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मायेची शाल व पुष्पगुच्छ देऊन 'लागीर झालं जी' मालिकेचे निर्माते-दिग्दर्शक तेजपाल वाघ, 'देऊळ बंद' चित्रपटातील अभिनेते अतुल कुडले, वाईचे भूषण सत्यजित माने व मोहसीन पठाण यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल विद्यानिकेतन फाउंडेशनचे अध्यक्ष व माई सिंधु सपकाळ यांचे मानसपुत्र शशिकांत कोचळे यांच्या निवड समितीचे विशेष आभार मानण्यात आले. प्रणोती कळमकर यांच्या यशाबद्दल माय मराठी नक्षत्र प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विजया मारोतकर, सचिव मंगेश बावसे, कोषाध्यक्ष डॉ. माधव शोभणे तसेच सर्व कार्यकारिणी व सदस्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




### शालिक जिल्हेकर यांना ग्रंथ भेट देऊन शुभेच्छा

**नागपूर :** नाटककार तथा ज्येष्ठ कवी शालिक जिल्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त हृदय चक्रधर आणि ज्येष्ठ गझलकार, भाषांतरकार भीमराव गणवीर यांनी १० सप्टेंबर रोजी त्यांच्या हिंगणा रोड येथील निवासस्थानी भेट देऊन पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देत शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या पत्नी सरोज जिल्हेकर उपस्थित होत्या. भेटीदरम्यान साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीच्या विविध विषयांवर दिलखुलास चर्चा झाली. साहित्याची सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवादी विचारांवर विचारांची देवाणघेवाण झाली. जिल्हेकर यांनीही आपल्या संग्रहातील काही पुस्तके चक्रधर व गणवीर यांना भेट दिली. या स्नेहभेटीतून साहित्यिक आत्मीयता आणि विचारांचा संवाद अधिक दृढ झाला.



### अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे आज वितरण

**नागपूर :** विदर्भ गौरव प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ पत्रकार स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार' यंदा रविवार, १३ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे.




पत्रकार क्लब ऑफ नागपूर, सिव्हिल लाईन्स येथील सकाळी १० वाजता. हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. स्वर्गीय अनिलकुमार हे स्वातंत्र्योत्तर काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत व पत्रकार म्हणून परिचित होते.

पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ मागील चार दशकांपासून विदर्भातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी २१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे आहे. २०२५ वर्षाच्या पुरस्कारासाठी 'ज्येष्ठ संपादक गिरीधर देशमुख (वरूड,जि.अमरावती), पत्रकार व संपादक नरेश गणपतराव डोंगरे (नागपूर) त पत्रकार मोहन मनोहर अटाळकर (अमरावती) यांची निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा खा.राजेंद्र जैन यांच्या हस्ते व आ. अरुण लखानी यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. उपेंद्र कोठेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आजचे कार्यक्रम

**तारीख** :- 13-9-2026
**वेळ** :- सकाळी 7.30 वा.
**धम्मप्रबोधन** :- नालंदा बुद्ध विहार, जयताळा.
**प्रबोधनकार** :- आचार्य, इंज़ि शुध्दोदन बडवणे
राष्ट्रीय अध्यक्ष, पारि. धम्म प्रबोधन समिती,
राष्ट्रीय बौद्ध महासभा
**विषय** :- महामंगल सुत्त (चवथे)

# लोटस पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त उत्कृष्ट शिक्षकांचा सत्कार



**नागपूर :** न्यू नेहरू नगर, म्हाळगी नगर चौक येथील लोटस पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त उत्कृष्ट शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप आगलावे, सचिव प्रा. नाना शेंडे, उपाध्यक्ष दिनकर वाठोरे, सहसचिव इंजि. रुपराज गौरी, कोषाध्यक्ष शिवदास वासे, राहूल घरडे, धम्मदिन्ना सार्वजनिक वाचनालयाच्या कोषाध्यक्षा जया गौरी, प्राचार्या कांचनलता नागदेवे व उपप्राचार्या अरुणा डहाके उपस्थित होते. सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. इंजि. रुपराज गौरी यांच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार यावर्षी पायल शंभरकर, आरती सपकाळे व वैशाली राऊत यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन प्रदान करण्यात आला. इतर शिक्षकांचाही विद्यार्थ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. इयत्ता ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावत अध्यापन केले. यावेळी इंजि. रुपराज गौरी यांचा वाढदिवसानिमित्त केक कापून शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेला व्हॅन उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. प्रदीप आगलावे यांनी त्यांचे आभार मानले. प्रत्युषा गणवीर व तनिष्का सिंग यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कांचनलता नागदेवे, संचालन सोनाली खोब्रागडे व आभार प्रज्ञा रामटेके यांनी मानले. यावेळी दिनेश वाघमारे, नरेश खडसे, दूधमोगरे, श्रावण शेंडे, बंडू वैद्य, नरेंद्र धनविजय, डॉ. विजय बागडे, अशोक शंभरकर, सोनडवले, महेश हरडे, प्रतिभा अतकरे, सुवर्णा हरले, सुनीता मेश्राम, मेघा कडुकर, प्रतिक्षा गणवीर, किरण कुकणकर, स्वाती टिवस्कर, तसेच लक्ष्मी लिल्हारे, प्रितम बनकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व धम्मदिन्ना सार्वजनिक वाचनालयाचा वाचकवर्ग उपस्थित होता. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व उपस्थितांना भोजनदान करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# दीक्षाभूमीच्या सुरक्षा भिंतीसह शांतीवनातील डम्पिंग प्रकल्पाविरोधात आज धरणे

**नागपूर :** दीक्षाभूमीच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेली सुरक्षा भिंत पाडल्यानंतर गेल्या तीन वर्षांत तिची पुनर्बांधणी का करण्यात आली नाही, तसेच जागतिक पर्यटनस्थळ असलेल्या बौद्ध क्षेत्र शांतीवन, चिचोली परिसरात प्रस्तावित मोठा कचरा डम्पिंग यार्ड प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी रविवार, १३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता दीक्षाभूमी येथील गायकवाड पुतळ्याबाहेर अन्नाभाऊ साठे चौकात 'जवाब दो' धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. दीक्षाभूमीच्या सुरक्षेसाठी मजबूत संरक्षण भिंत उभारण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र शासन व एनआयटीकडून ही भिंत पाडण्यात आली. एका महिन्यात पुनर्बांधणी करता येणारी ही भिंत मागील तीन वर्षांपासून उभारण्यात आलेली नाही, असा आंदोलकांचा आरोप आहे. त्यामुळे दीक्षाभूमीच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असून, भिंत बांधायची नव्हती तर ती पाडलीच कशासाठी? असा सवाल उपस्थित करून संबंधितांकडून याबाबत स्पष्ट उत्तर मागण्यात येणार आहे. दुसऱ्या महत्त्वाच्या विषयात जागतिक पर्यटनस्थळ असलेल्या बौद्ध क्षेत्र शांतीवन, चिचोलीलगत प्रस्तावित करण्यात येत असलेल्या मोठ्या कचरा डम्पिंग यार्ड प्रकल्पाला विरोध करण्यात येणार आहे. बौद्ध पर्यटन व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या परिसराचे पर्यावरण आणि पावित्र्य धोक्यात आणणारा हा प्रकल्प तातडीने रद्द करावा, अशी आंदोलकांची मागणी आहे. या धरणे आंदोलनात सत्यशोधक समाज, एसएसडी मानवाधिकार ॲक्शन टीम, भारत बौद्धमय अभियान तसेच विविध संघटना, विहार समित्यांचे उपासक-उपासिका आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. प्रिया खोब्रागडे, विशाल भशारकर, भावेश फुलझले, नरेंद्र नरगडे, नरेंद्र इंगळे, रविंद्र भटकर, तारा मेश्राम, श्रीकांत कांबळे, प्रेम घरडे, बाबा मोहोड, रविंद्र दांडगे, संगितबाबू इंगळे, अमोल तिरपुडे, नागमित्र धर्मेश पाटील आदी कार्यकर्त्यांनी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# रविवारी होणार 30 शिक्षकांचा आदर्श गुरुरत्न पुरस्कार देऊन सन्मान!

## डॉ. सुहासिनी वंजारीना जीवनगौरव पुरस्कार जाहीर !

**नागपूर :** औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था नागपूर तर्फे शिक्षक दिनानिमित्त 13 सप्टेंबर रविवारला डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात दुपारी 12 वाजता नागपूर-विदर्भातील उत्कृष्ट शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या 30 शिक्षकांना गुरुरत्न पुरस्कार देऊन तसेच पुरस्कारसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या सर्व 130 शिक्षकांना ही सन्मानाने निमंत्रित करून त्यांना ही शिक्षक दिवसाच्या निमित्ताने प्रशस्तीपत्र आणि भेटवस्त देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, आ. विकास ठाकरे, शिक्षक आ. सुधाकर अडबोले यांच्यासह जि. प. चे मुख्य कार्यपालन अधिकारी विनायक महामुनी, शिक्षण उपसंचालिका डॉ. माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी अनिल डोईफोडे, डायटच्या प्राचार्य डॉक्टर हर्षलता बुराडे, निधी वनचे संचालक मनोज कुंभारे, वेदचे संचालक चंद्रप्रकाश चतुर्वेदी, मानव विकास संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जोध आदि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार समारोह होणार आहे. या सोहळ्याला शिक्षक, त्यांचे कुटुंबीय व शिक्षण प्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक भाग्यश्री पवार, मिथिलेश ढवळे, निधी वनचे संचालक मनोज कुंभारे, वेद वेलले संचालक चंद्रप्रकाश चतुर्वेदी यांनी केले आहे.

# नागपूर जि. प. शिक्षक संघटनेच्या समन्वय समितीतर्फे १४ आदर्श शिक्षकांचा सत्कार



**नागपूर :** नागपूर जिल्हा परिषद प्रशासनाने शिक्षक दिनानिमित्त आदर्श शि क्ष कां च या सत्काराचा कार्यक्रम आयोजित न केल्याच्या निषेधार्थ नागपूर जिल्हा परिषद शिक्षक संघटनेच्या समन्वय समितीतर्फे हिंदी मोर भवन सभागृहात १४ कर्तृत्ववान शिक्षकांचा सत्कार केला. प्रशासनाने वेळेअभावी कार्यक्रम रद्द केल्याबद्दल उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष लीलाधर ठाकरे होते. धनराज बोडे, समीर सुदामे, प्रवीण फाळके, लीलाधर सोनवणे, उमाकांत अंजनकर, संतोष माळवे, स्वाती लोन्हारे, प्रमोद लोन्हारे, जुगलकिशोर बोरकर, नरेश भैसवार, तसेच प्राचार्य सुभाष खाकसे, विलास भोतमांगे, भूपेष चव्हाण, सुधीर गवारकर, तुषार चरडे, नंदकिशोर काळे व मुरलीधर काळमेघ यांच्या हस्ते शिक्षकांचा सत्कार केला. प्राथमिक विभागातून ममता बासेवार (नरखेड), सतीश चव्हाण (भिवापूर), वंदना आसोले (सावनेर), अर्पणा लांभाटे (कुही), अनंता सावरकर (पारशिवनी), श्यामकांत नेरकर (कळमेश्वर), वसंत पिसे (हिंगणा), संदेश गणवीर (कामठी), श्रीकृष्ण नागरगोजे (मौदा), अरुण बावणे (भिवापूर, दिव्यांग), मीनल देवरणकर (नागपूर ग्रामीण), शेषराव मुनघाटे (उमरेड) व चंद्रकांत कुंभारे (उमरेड), तर माध्यमिक विभागातून भाग्यश्री कापकर (हिंगणा) यांचा शाल, श्रीफळ, रोपटे व मिठाई देऊन सत्कार केला. शिक्षक दिनासाठी वेळ नसल्याचे कारण देणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याचे सांगत उपस्थितांनी जिल्हा परिषदेला देण्यात आलेल्या 'गतिमान पुरस्कारा'च्या निकषांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तीन तालुक्यांतून प्रस्ताव येऊनही आदर्श शिक्षकांची निवड न झाल्याबद्दल शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी केली. कार्यक्रमाचे संचालन दिपक शेंडे यांनी केले. प्रस्तावना धनराज बोडे यांनी, तर आभार आशुतोष चौधरी यांनी मानले.

# मानकापूर लुंबिनी बुद्धविहारात धम्मप्रबोधन



**नागपूर :** मानकापूर येथील लुंबिनी नगरातील लुंबिनी बुद्धविहारात लुंबिनी बौद्ध सेवा समितीच्या वतीने रविवार, ६ सप्टेंबर रोजी वर्षावासानिमित्त धम्मप्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. धम्मचारी ललितमित्र यांनी धम्मप्रबोधन केले. कार्यक्रमाला अकोला येथील साहित्यिक व 'गाथा रमाई'कार पंजाबराव वर, राजू काळे आणि नागलोक येथील धम्मचारी क्षांतिप्रभ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. धम्मचारी ललितमित्र यांनी, "चूक मान्य करणारा आणि इतरांना क्षमा करणारा मनुष्य मोठा होतो. सर्वांनी कुशल कर्म करावे," असा संदेश दिला. पंजाबराव वर यांनी महामाता रमाईच्या जीवनकार्याचा परिचय करून देत महिलांनी रमाईचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी 'गाथा रमाईची' या पुस्तकांची विक्रीही केली. कार्यक्रमाला संस्थापक सचिव फूलचंद टेंभूर्णे, अध्यक्ष दीपक फुलझेले, उपाध्यक्ष प्राणनाथ भिवगडे, सचिव सुखदेव मनोहरे, सहसचिव अशोक बागडे, कोषाध्यक्ष अभिजीत कांबळे, चंद्रमणी डोंगरे, सुनील निरंजने, गुड मॉर्निंग योगा क्लबचे प्रफुल्ल तागडे यांच्यासह पदाधिकारी व लुंबिनी नगरातील उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन सुखदेव मनोहरे यांनी, तर आभार चंद्रमणी धोंगळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अभिजीत कांबळे, सुनील निरंजने व महिला मंडळाने सहकार्य केले. यावेळी समाजाधारित 'जयंती-२' चित्रपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन करण्यात आले.

# जैन इरिगेशनमध्ये फिजिओथेरपी दिनानिमित्त कार्यशाळा

(डॉ. अनिलकुमार पालीवाल)

**जळगाव :** जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडमध्ये सहकाऱ्यांच्या आरोग्य व शारीरिक तंदुरुस्तीसाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. गांधी तीर्थच्या कस्तूरबा सभागृहात झालेल्या कार्यशाळेत "निरोगी शरीर, शांत मन आणि सुरक्षित कार्यपद्धती" या त्रिसूत्रीवर मार्गदर्शन करण्यात आले.

जैन इरिगेशन सिस्टिम्स, जैन फार्मफ्रेश फूड लि., भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन व डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे दीपप्रज्वलन अशोक जैन, डॉ. कल्याणी नागुलकर, डॉ. हिमांशू भारद्वाज, डॉ. पायल संचेती, डॉ. साक्षी बरडिया व डॉ. हितांशी शिंदे यांच्या उपस्थितीत झाले. डॉ. कल्याणी नागुलकर यांनी 'Movement As Medicine' विषयावर मार्गदर्शन करत नियमित व्यायाम, योग-ध्यान, विश्रांती व ताण व्यवस्थापनाचे महत्त्व सांगितले. चुकीच्या कार्यपद्धती, वारंवार हालचाली, अधिक शारीरिक श्रम व कंपनामुळे स्नायू-सांध्यांच्या समस्या उद्भवू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. पायल संचेती यांनी औद्योगिक आरोग्यावर सादरीकरण केले, तर डॉ. हिमांशू भारद्वाज यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात अशोक जैन यांनी फिजिओथेरपी निरामय आयुष्यासाठी उपयुक्त असून नियमित शास्त्रीय व्यायाम, शांत झोप व मानसिक स्वास्थ्यासाठी ध्यान आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक, किशोर कुलकर्णी यांनी संचालन व गिरीष कुलकर्णी यांनी आभार मानले.

# वनार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांचे उपोषण स्थगित

## मुख्यमंत्र्यांचे १५ दिवसांत निर्णयाचे आश्वासन



नागपूर : व्हीजे-ए तसेच एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी प्रवर्गातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना स्वतंत्र अधिछात्रवृत्ती योजना सुरू करण्याच्या मागणीसाठी 'वनार्टी' कार्यालयासमोर सुरू असलेले बेमुदत उपोषण सातव्या दिवशी स्थगित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर १५ दिवसांत ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. शासनाच्या आश्वासनावर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, १५ दिवसांत लेखी व सकारात्मक निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन तीव्र करण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला. यावेळी बालासाहेब घुगे, निलेश घुगे, कृष्णा नागरगोजे, रवि राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# पालि भाषा प्रचार परीक्षा १३ डिसेंबरला

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीतर्फे यावर्षी पालि भाषा प्रचार परीक्षा १३ डिसेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व बुद्धविहारांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेच्या नियोजनासाठी कार्यकर्त्यांना पुस्तकांची मागणी विद्यार्थ्यांच्या अपेक्षित संख्येनुसार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मागील वर्षी ज्या बुद्धविहारांमध्ये पालि भाषा परीक्षा घेण्यात आली होती, त्या ठिकाणच्या परीक्षार्थी संख्येचा आधार घेऊन यंदाच्या पुस्तकांची मागणी करावी. कोणत्याही आधाराशिवाय अथवा अंदाजापेक्षा अधिक पुस्तकांची मागणी करू नये, अशी सूचना समितीने केली आहे. पालि भाषा परीक्षेसाठी पुस्तकांचे वाटप १ ऑगस्टपासून सुरू झाले आहे. विशेषतः पुस्तक क्रमांक १ ची मागणी करताना यावर्षी पहिल्या परीक्षेला अंदाजे किती विद्यार्थी बसतील, तेवढ्याच संख्येने पुस्तकांची मागणी करावी, असे समितीने स्पष्ट केले आहे.

अधिक माहितीसाठी ए. के. पाटील (७९७२९८७५८४), आनंद वासनिक (९८२२२३८७५७) आणि धेनूत्तम बोंबर्डे (९५६१५६१७८८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648